
६ जुलै १९६८ । चाळीस पैसे

# माणूस



कुठल्याही बलिष्ठ सत्तेचे
हस्तक बनण्यास
हो चि मिन्हने आजवर
नकारच दिलेला आहे.

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : सहावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. जून, २५


'बावला' खून खटल्यात फाशीची शिक्षा झालेले व नंतर दैवगतीने वाचलेले श्री. पोंदे यांच्याविषयी २२ तारखेच्या अंकांत आलेला मजकूर वाचला. त्या निमित्ताने आठवलेली मनोरंजक हकीकत कळवीत आहे.

मी १९३१।३२ मध्ये इंदूरच्या होळकर कॉलेजचा विद्यार्थी होतो आणि होस्टेलमध्ये राहात होतो. एक दिवस रात्री बावला खटल्यातील पोंदे तुरुंगातून सुटल्याची बातमी होस्टेलमध्ये पसरली आणि त्यांचा नातेवाईक होस्टेलमध्ये होता, त्याचेकडे ते यऊन गेले असावेत, म्हणून त्या बातमीला अधिक महत्त्व आले.

त्या वेळी आणखी एक किस्सा ऐकण्यात आला. श्री. माधवनाथ महाराज नावाचे एक सत्पुरुष आणि योगी त्यावेळी इंदूरास पुष्कळदा मुक्कामास असत. बावला खटल्यात शिक्षा झाली, त्या पोंदे यांचेबरोबर दिघे नावाचे एक गृहस्थ होते. या दोघांच्या बायका श्री नाथांच्या दर्शनाला गेल्या होत्या. मनातला हेतू अर्थात उघड होता. तेव्हा श्री नाथ सहज बोलल्याप्रमाणे म्हणाले, "कर्म करताना कोणी विचारीत नाही, मग येऊन काय फायदा !" अर्थात त्यावर कोणी काहीच बोलले नाही. पण उठताना त्यांनी सौ. पोंदे यांचेपुढेच फक्त कुंकवाचा करंडा केला. — म. म. केळकर

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



# फँटॅस्टिक व्हॉयेज

रा त रा णी । रा त रा णी

वि ज य तें डु ल क र

आजच्या जगातले नवे सिद्ध पुरुष म्हणजे शास्त्रज्ञ. एखाद्या सुरस आणि चमत्कारिक बाणाच्या भाकडकथेतच शोभतील, असे एकेक चमत्कार ही मंडळी प्रत्यही खरे करून दाखवीत आहेत आणि यांच्याच एखाद्या चमत्काराने हे सगळे जगच एखाद दिवशी आपल्यासह आटोपले नाही तर भविष्याच्या उदरात यांचे आणखी कोणकोणते अद्‌भुत चमत्कार दडलेले आहेत, हे एक 'कॉम्प्यूटर'च जाणे! (कारण हाच उद्याचा सर्वसाक्षी विधाता ठरणार आहे.) यांच्या शास्त्रीय चमत्कारांनी बाकी काय कुणाचे भले झाले असेल ते असो, परंतु हॉलिवुडमधल्या चित्रनिर्मात्यांना मात्र एक नवे क्षेत्र लाखो–करोडो डॉलर्स ओतून काढण्याच्या सप्तरंगी चित्रपटांसाठी उपलब्ध झाले. यांचे 'स्टोरी डिपार्टमेंट' रोज नव्या शास्त्रीय चमत्कृती शोधून काढू लागले, तशा सापडल्या नाहीत तर त्यांच्या कल्पना करू लागले आणि 'शास्त्रीय' या लेबलाखाली एकेक बरेवाईट कल्पनारम्य, दे-मार, सन-

सनाटी, मती गुंग करणारे चित्रपट इतर साचेबंद मालाबरोबर या चित्रपट फॅक्टरीतून रोज तयार होऊन बाहेर पडू लागले. 'फॅटॅस्टिक व्हॉयेज'—मती गुंग करणारे जलपर्यटन—हा ट्वेंटिएथ सेंच्युरी फॉक्स–निर्मित असाच एक अफलातून चित्रपट; त्यातील कलात्मकतेचा हिशेब विसरण्याला लावून केवळ वीतभर कल्पनेच्या जोरावर प्रेक्षकाला भक्कम धरून ठेवणारा.

## जेमतेम वितीचे जलपर्यटन

या जलपर्यटनाचे स्वरूपच विचित्र आणि फार विलक्षण. हे जलपर्यटन महाभयंकर जलचरांनी गजबजलेल्या एखाद्या महासागरातले असेल म्हणता? मुळीच नव्हे; हे माणसाच्या शरीरातले. तेही मानेच्या बुंध्यापासून मेंदूपर्यंतचे—जेमतेम वितीचेच. तुम्ही हसाल. म्हणाल, हा काय विनोद? पण चित्रपट पाहताना या वितीच्या प्रवासाने, त्यातील धकाधकीने, प्राणांतिक धोक्यांनी, वेगाने आणि हाणामारीच्या अरिष्टांनी तुम्हांला अक्षरशः गरगरू लागेल. दोन–चार लक्ष मैलांची यात्रा वाऱ्या-वादळांना तोंड देत पुरी केल्याइतकी धाप तुम्हाला जागच्या जागी लागेल.

कम्युनिस्ट जगातला कोणी एक बडा शास्त्रज्ञ जॅन बेनेस अमेरिकन हेर ग्रँट याच्या मदतीने अमेरिकेत पळून येतो. विमानतळावरून गुप्त सरकार-नियोजित स्थळी कडेकोट बंदोबस्तात त्याला नेण्यात येते. परंतु कम्युनिस्ट हेरदेखील हुशार; ते ही घटना हेरून वाटेत बेनेसचा काटा काढून त्याच्याबरोबर त्याच्या मेंदूतले फार मोठे शास्त्रीय गुपित नष्ट करण्याची जिद्द करतात. बेनेसच्या मेंदूला मोठी इजा होते; तीही अशा स्वरूपाची की कवटी फोडून नेहमीसारखी मेंदूवर शस्त्रक्रिया करणे अशक्य असते.

शस्त्रक्रिया मेंदूच्या आतून झाली पाहिजे?

ती कशी होणार? पण फिकीर नको. त्याची सोय स्टोरी डिपार्टमेंटने आधीच आपले मेंदू एकवटून केलेली असते. ही सोय: सीएमडी एफ! हे सीएमडी एफ म्हणजे काय प्रकरण? कम्बाइण्ड मिनिएचर डिटरंट फोर्सेस नावाची ही एक शास्त्रीय यंत्रणा—ही माणसे आटवते. नुसती माणसेच नव्हेत तर शस्त्रास्त्रे आणि ती वाहून नेणारी उडती-बुडती वाहनेदेखील. एखाद्या मोठ्या पाणबुडीचा आकार हिच्या कृपेने जंतुहूनही सूक्ष्म होतो, आता बोला! संपूर्ण शस्त्रास्त्रसज्ज फौज आटवून ती बाटलीच्या झाकणाएवढ्या आकारात बसवून शत्रूच्या मुलखात सोडण्याचे या संघटनेचे स्वप्न असते! जॅन बेनेस याच्या मेंदूच्या आतून शस्त्रक्रियेची तजवीज ही संघटना आपल्या अंगावर घेते आणि तत्काळ कामास लागते. योजना: शास्त्रज्ञ आणि वैद्यकीय तज्ज्ञांच्या एका पथकासहीत एक पाणबुडी आटवून जंतूएवढी सूक्ष्म करायची—डोळ्याला दिसणार नाही एवढी सूक्ष्म—आणि तिला अणुशक्ती बसवून ती बेनेस याच्या मानेवाटे इंजेक्शनद्वारे रक्तप्रवाहात सोडायची. या पाणबुडीने बेनेसच्या मेंदूपर्यंत पोचायचे आणि शस्त्रक्रिया करण्यात यायची

पाणबुडीचे निश्चित उद्दिष्ट : बेनेस याच्या मेंदूच्या गाभ्यातलाच थ्रॉम्बसनामक भाग. जाण्याच्या आणि परतीच्या मार्गाचे तपशीलवार नकाशे तयार करण्यात येतात. या प्रवासाच्या वेळी बेनेस याच्या रक्तप्रवाहाचा वेग नियंत्रित करण्यात येणार असतो. या प्रवासावर शस्त्रक्रियादालनात बडे शास्त्रज्ञ रेडिओ-अॅक्टिव्ह ट्रेसरद्वारे लक्ष ठेवणार असतात. तिहेरी दळणवळणाची सोय असलेला टेलिव्हिजनही यासाठी वापरण्यात येणार असतो.

महत्त्वाचे हे की निघाल्यापासून बरोबर साठ मिनिटांत ही शस्त्रक्रिया आटोपून या आटीव मंडळींनी मूळ जागी आले पाहिजे; एरवी वांधा ! कारण साठ मिनिटां-बाहेर एक सेकंदही आटलेल्या गोष्टी आटलेल्या ठेवणे या यंत्रणेच्या हाती नसते. त्या फट्दिशी मूळ आकारात येतात.

आहे का नाही स्टोरी डिपार्टमेंटची कमाल ?

या शास्त्रीय 'मसाल्या'त आणखी एक पिल्लू सोडून देण्यात आले आहे — घातपाती कारवायांची शक्यता !

## भरपूर धमाल

तिकडे बेनेसच्या मेजाची उठाठेव चालू असता इकडे आपला श्वासोच्छ्वास बंद पडण्याची पाळी ! कारण हे सर्व चमत्कारिक प्रकरण तेवढ्यापुरते खरे आणि प्रभावी वाटावे म्हणून तंत्रज्ञांनीही शिकस्त केली आहे. या बेहोष बेनेसच्या शरीरा-तल्या पांढऱ्या आणि लाल पेशींपासून त्याचे कान, काळीज, मेंदू अशा एकेका भागापर्यंतचे 'नेपथ्य' फार प्रभावीपणे आणि तरी नजर सुखवील असे या मंडळींनी उभे केले आहे. मानवी शरीराच्या अंतर्भागाचे इतके देखणे दर्शन आरोग्य शास्त्राच्या पुस्तकात आपल्याला कधीही झालेले नाही. तिथे सगळेच वास्तवदर्शी, शास्त्रशुद्ध — आणि इथे नुसतेच अद्भुतरम्य.

या वीतभर जलपर्यटनात बेनेसच्या शरीरातील दोषांमुळे, बाहेरच्या आवाजांमुळे, पाणबुडीत 'डिफेक्ट' निघाल्याने आणि अखेर अखेर बेनेसच्या श्वासोच्छवासाने देखील मोठमोठ्या आपत्ती कोसळतात, भयानक वादळे उदभवतात, प्राणावर बेतते, आणि मानवी शरीरात शिरलेले हे कोलंबस अखेर काळाशी शर्यत खेळत बेनेस-महाराजांचा मेंदू गाठतात, शस्त्रक्रियेला हाणामारीने सुरुवात होते, क्षण आणि क्षण महत्त्वाचा असतो, तेवढ्यात कालमर्यादा संपते — पाणबुडीचा आकार वाढू लागतो, — नाना गोंधळ आणि भरपूर धमाल ! बेनेसच्या शरीराचा अक्षरशः व्हिएतनाम ! एका अत्यंत गुप्त शास्त्रीय गुपितासाठी !

चित्रपट संपूर्ण पाहिल्यावरही हे गुपित आपल्याला गुपितच राहावे अशी स्टोरी डिपार्टमेंटची व्यवस्था आहे. पण ते आपण पुरेसे चाणाक्ष असू तर शेवटी कळते; 'प्रेक्षकांना कसे झुलवावे' ते हे गुपित !

काही का असेना, वेळ चांगला जातो. अनेकदा मती गुंग होते. या चित्रपटात नट-

नटी कोण आहेत ते विचारण्याचे कारण नाही, तो सर्वस्वी दिग्दर्शक, छायालेखक, आणि नेपथ्यकारांचा आहे. स्टीफन बॉइड, आर्थर केंनेडो, एडमंड ओब्रायक, आर्थर ओ'कोनेल, डोनाल्ड प्लेजेन्स, विल्यम रेडफील्ड असे कुणी कुणी नट यात आहेत वस्तुत: गरज नाही पण राक्वेल वेल्च आदी दोन नटीही आहेत. नटींशिवाय धकाधकीत 'रोमान्स' नाही. ! दिग्दर्शक आहेत रीचर्ड फ्लेशर.

आपल्याकडे अद्याप शरीराची तीच तीच बाह्य दर्शने आपले निर्माते घडवीत असताना ही पाश्चात्य मंडळी शरीराच्या आत घुसून वीतभर लांबीची चित्तथरारक नवरसयुक्त जलपर्यटने चित्रित करताहेत.

कलेच्या व्यापारातदेखील आपण मागेच, हेच खरे. ○



ज्वलंत राष्ट्रवादाच्या
भयानक दीप्तीचा
ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री
मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,
४१९ नारायण पेठ, पुणे २.



## □ गांधीछाप चलनी नोटा

तुम्ही वाच लेच असेल ! महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीनिमित्त गांधीछाप नोटा निघणार आहेत. एक रुपयापासून शंभर रुपयांपर्यंत सर्व प्रकारच्या चलनी नोटा काढण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेने केला आहे. कलावंतांकडून त्यासाठी मुद्दाम नमुनेही मागवले आहेत.

ही वार्ता वाचल्यावर आपल्यासारख्या सर्वच गांधीभक्तांना अत्यानंद होईल हे उघड आहे. गांधीजींचे मोठेपण आणि या देशाचा अवाढव्य विस्तार या दोन गोष्टी लक्षात घेता, बापूजींची स्मारके जितकी होतील तेवढी पाहिजेच आहेत. पुतळे, गांधीग्रामे किंवा ' महात्मा गांधी रोड ' असली रस्त्यांची नावे यांनी काय भागणार आहे ? लोक आताच बापूजींना विसरू लागले आहेत. पाकिस्तानशी आणि चीनशी केलेल्या लढायांचा दुसरा काय अर्थ होतो ? अवघ्या वीस वर्षांत ' गांधीयुग ' संपून जावे हे काही बरे नाही. अहो, दर शुक्रवारी गांधी-प्रार्थना नभोवाणीवर होते तेव्हा लोक सरळ खट् करून रेडियो बंद करून बसतात. इतके तर लोक इँबीस झाले आहेत. [ त्यातून गांधी-आत्मचरित्राचे वाचन सुरू झाल्यापासून तर अनेकांनी रेडियो लावण्याचेच सोडून दिल्याची कुणकुण आहे. ] अशा दुष्ट वातावरणात बापूजींची आठवण ठेवण्यासाठी नवेनवे शोध लावणे सरकारला भागच आहे. गांधी-छाप नोटा काढण्याची कल्पना त्या दृष्टीने उत्कृष्ट आहे.

बाकी गांधीछाप नोटा काढल्या म्हणजे मात्र मजा होईल. जिकडे तिकडे बापूजीच बापूजी. महात्माजींना आणि त्यांच्या थोर तत्त्वज्ञानाला ज्यांनी जन्मभर विरोध केला त्यांनासुद्धा बापूजींच्या नोटा खिशात घालून यापुढे हिंडावे लागेल. बापूजींचा त्याग करणे त्यांच्या अगदी जीवावर येईल. झोपडीझोपडीत दिवा नेण्याची कल्पना मागे निघाली होती. त्याप्रमाणे प्रत्येक झोपडीत दिवा गेला की नाही माहीत नाही पण झोपडीझोपडीत बापूजींचा हा फोटो जाईल हे नक्की. अगदी सरकारी तिजोरी-पासून तो गाडग्यामडक्यापर्यंत सगळीकडे. अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या या थोर महात्म्याचा लाभ व्हावा म्हणून खून, मारामाऱ्याही (नेहमीप्रमाणे) होतच राहतील. काळ्या बाजारातही या चलनी नोटा उजळ माथ्याने हिंडतील आणि हा बाजार

पवित्र करतील. बापूंच्या हास्यमुद्रेकडे बघतबघतच दुनियेतले सगळे व्यवहार उरकले जातील. गांधीजींच्या स्मारकाची ही कल्पना खरोखर अप्रतिम आहे. आता एकच सूचना. गांधीजींच्या प्रत्येक फोटोखाली एखादे सुंदर ब्रीदवाक्यही सरकारने छापावे. उदाहरणार्थ, एक रुपयाच्या गांधी प्रतिमेखाली 'हे राम' बरे दिसेल. पाच रुपयांचे गांधी 'हाय अल्ला' या शब्दांनी शोभून दिसतील. शंभर रुपयांच्या नोटेवर 'मैं क्या करू राम, मुझे बुढ्ढा मिल गया' ही काव्यपंक्ती चालेल काय? - सरकारने विचार करावा.

## □ फादर फेरर यांचा असह्य वियोग

आमचा हा मजकूर प्रसिद्ध होऊन वाचकांच्या हाती पडेल तेव्हा मनमाडकर फादर फेरर हिंदुस्थान सोडून मायभूमीला निघून गेले असतील. गेली अनेक वर्षे मनमाड भागात ज्या पुण्यश्लोक महात्म्याने आमच्या शेतकऱ्याने तोंड वासल्याबरोबर भीक घातली, हात पसरल्याबरोबर पैसे टाकले, शेत दाखवल्याबरोबर विहीर दिली, त्याच्यावर महाराष्ट्र सरकारने हद्दपारीचा प्रसंग आणावा ही आम्हा भारतीयांना किती लाजीरवाणी गोष्ट आहे! आपली संस्कृती काय, आपली परंपरा काय, आणि आपण चालविले आहे काय! सापालासुद्धा दूध पाजणारी आपली संस्कृती. अंगावर थुंकणाऱ्या यवनाला ब्र न म्हणता शांतपणे गंगेचे स्नान पुनः पुन्हा करणाऱ्या एकनाथांची आपली परंपरा. पोळी पळवणाऱ्या कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन धावणाऱ्या नामदेवाचा हा थोर देश. फादर फेररला आपण अशी अमानुष वागणूक द्यावी? केवळ काही विघ्नसंतोषी आणि उपद्व्यापी लोकांनी तक्रारी सुरू केल्या म्हणून? धिःक्कार-धिःक्कार असो. महाराष्ट्रसरकारच्या या संकुचित आणि अमानुष धोरणाचा धिःक्कार असो!

फादर फेररसाहेब तर आता चालले. तुम्हा आम्हा गरिबांचा पोशिंदा, अनाथांचा नाथ आता कायमचा निघून चालला. मनमाडच्या परिसरातील खेड्यापाड्यांत हल्लकल्लोळ उडाला असेल. लोक धाय मोकळून रडत असतील. फादरबाबा, आता आम्हांला फुकट पैसे कोण वाटणार? काही न करता घरबसल्या आम्हाला विहीर खणून कोण देणार? ख्रिश्चन बनवून प्रभूच्या प्राप्तीचा सोपा मार्ग आम्हा चुकलेल्या मेंढरांना कोण दाखवणार?'—अशा किंकाळ्यांनी आसमंत भरून गेले असेल. आता आपल्याला स्वतःच काम करून पोट भरावे लागेल या भीषण जाणिवेने अनेकांच्या पोटात गोळा उठला असेल. आता आपल्याला आपल्याच दुष्ट सरकारकडे मदतीसाठी धाव घ्यावी लागेल, या कल्पनेने कित्येकांचे चेहरे पांढरेफटक पडले असतील. छेः छेः! मनमाड भागात केवढा अनर्थ उडाला असेल याची केवळ कल्पनाच केलेली बरी.

पण बापहो, भिण्याचे कारण नाही. नुकतीच ताजी वार्ता कानी पडली आहे की, फेररबाबांना जरी महाराष्ट्र सरकारने हाकलले असले तरी महिनाभराने ते परत येतील. फार तर नतद्रष्ट महाराष्ट्रात ते येणार नाहीत. पण इतर प्रांतांत आपले काम सुरू करण्यास त्यांना मोकळीक मिळणार आहे. गुजरातमधील मंडळींनी तर घरी जाऊन समक्ष आमंत्रण दिलेही म्हणे. फादरकाका या आणि गुजरातची शेती सुधारा, ही बातमी पिलू मोदीनेच परवा जाहीर सभेत सांगितली. आता तुम्ही म्हणाल, हा पिलू मोदी आणखी कोण ? खरे सांगायचे म्हणजे मलाही माहीत नाही. पण कुणीतरी प्रतिभासंपन्न पुरुष असला पाहिजे एवढे तर नक्की ? मोदी घराण्यातले 'पिलू' जर एवढे हुषार तर हत्ती मोदींची प्रतिभा केवढी अचाट असेल !

ते काही असो. फेररकाका परत येणार आहेत, या बातमीने मला जरा धीर आला. महाराष्ट्र शासनाने अजूनही विचार करावा. फेररअण्णा एवीतेवी परत येणारच असतील तर त्यांचा लाभ पुन्हा महाराष्ट्रालाच का घडू नये ? 'संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा' हे तुकोबांचे वचन आम्ही विसरलो काय ? हे काही बरे नाही. मला तर वाटते, फेररबाबा परतले की, महाराष्ट्र शासनाने त्यांचा जाहीर सत्कार करावा. त्या दिवशी सार्वजनिक सुटी जाहीर करावी आणि सचिवालयावरच्या गच्चीवर रंगीबेरंगी रोषणाई करावी. या दारूकामाला तर बंदी नाही ना ? मग झाले तर ! आपली चूक सुधारण्याचा महाराष्ट्र शासनाला आता एवढाच मार्ग मोकळा आहे. तूर्त, 'वाटुली पाहता, शिणले डोळुले' असे म्हणत आपण फेररबाबांची वाट पाहू या.

## ☐ कसा पिकला ग गहू-हरभरा....


यंदा आपल्या देशात गहू अमाप पिकला आहे, असे म्हणतात. पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश या भागात बाजारपेठा गव्हाच्या पोत्यांनी काठोकाठ भरल्या आहेत. पण तरीही यंदा अमेरिकन गहू देशात येणारच आहे ही बातमी समाधानकारक आहे. अमेरिकन गहू या देशात पाहिजेच. त्याशिवाय आम्हांला अन्न गोड लागतच नाही. आपण खातो ते सगळे अन्न देशातले आहे आणि सत्त्वयुक्त आहे असे जर आमच्या मंडळींना उद्या सांगितले तर त्यांचा घास घशात अडकल्याशिवाय राहणार नाही. आपल्या प्रत्येक दोन पोळयांमागे तिसरी पोळी परदेशी गव्हाची असते आणि तो गहू अगदी निकृष्ट असतो हे आम्हाला माहीत आहे म्हणून बरं, अन्न घशाखाली जाते तरी. सगळेच सत्त्वयुक्त धान्य आमच्या पचनीच पडणार नाही. फोलपटाची आणि निःसत्त्व अन्नाची सवय एकदा पोटाला झाल्यावर असल्या अन्नाने आमचे आरोग्य धोक्यात येणार नाही काय ?

अमेरिकन गहू येणे का आवश्यक आहे हे आता समजले ना? आता

अडचण एवढीच आहे, की आपला पौष्टिक गहू यंदा खूप पिकला आहे. त्यामुळे बाजारभाव घसरणार. हा गहू स्वस्त होणार आणि लोक तोच खाणार. अडाणी लोकांना काय, जरा स्वस्त झाला पदार्थ की लागले खायला, पण आम्ही शहाण्यांनी तरी काही विचार केला पाहिजे की नको ?

माझ्या दृष्टीने या अपप्रवृत्तीस आळा घालण्याचा एकच उपाय आहे. आपल्या गव्हाचा पुन्हा तुटवडा निर्माण करणे आणि त्याचे भाव वाढवणे. परवाच एक आनंदाची वार्ता आली, की आपला बराचसा गहू उत्तर–प्रदेश–नेपाळ मार्गे चीनला जाऊ लागला आहे. चीनमध्ये साडेतीन रुपये किलो भाव आपल्या गव्हाला मिळतो. जवळजवळ पंचवीस सहस्र मण गहू आतापर्यंत चीनमध्ये जाऊन दाखल झालासुद्धा म्हणतात. ही बातमी ऐकली आणि मी सुटकेचा निःश्वास सोडला. चला, आपल्या व्यापाऱ्यांना चांगल्यापैकी भावही मिळाला आणि इकडचा उगीचच जास्त पिकवलेला गहूही खपला. धान्याची ही चोरटी निर्यात अशीच पद्धतशीरपणे वाढवली तर आपल्या आरोग्याचा प्रश्न लवकरच सुटेल.

पण देशी गव्हाची चणचण भासावी यासाठी आपल्या सरकारने जो उपाय योजला आहे तोही चांगला आहे. चीनकडे गहू जाऊन जाऊन जाणार किती ? आणि त्यामुळे आपला गहू होऊन होऊन कमी होणार किती ? चांगल्या देशी गव्हाचा तुटवडा पडून त्याचे भावही चढावेत यासाठी आपल्या गव्हाची मोठ्या प्रमाणावर नासाडी होणे आवश्यक आहे. अमेरिकेत नाही का, गहू जास्त पिकला तर जाळून टाकतात ?...तसेच येथे व्हायला पाहिजे. सरकारने त्या दृष्टीने जी दक्षता घ्यायला सुरुवात केली आहे ती सरकारच्या कल्पकतेची साक्ष होय. सध्या पावसाळा नुकताच सुरू झाला आहे. अशा स्थितीत हजारो पोती उघड्या वाघिणीतून दूर परगावी पाठवली तर नक्कीच पोती भिजतील आणि आतला गहू खराब होईल. एक तर तो फेकून तरी द्यावा लागेल किंवा खाल्ला तर तो पहिल्याइतका सत्त्वयुक्त असणार नाही. सरकारने ही गोष्ट बरोबर हेरली. परवाच पंजाबमधून कलकत्त्याला जो हजारो पोती गहू गेला तो असाच उघड्या वाघिणीतून पाठवला. न जाणो, ताडपत्र्या साध्या टाकल्या तरी पोती कोरडीच राहतील म्हणून सावधगिरीचा उपाय म्हणून ताडपत्र्यादेखील वर न टाकण्याची काळजी घेण्यात आली. याचा बरोबर परिणाम होऊन हजारो पोती चिंब भिजलेल्या स्थितीत कलकत्त्याला पोचली, आता हरकत नाही. लोकांनी खुशाल हा गहू खावा. त्यांचे आरोग्य बिघडण्याची आता कोणत्याही प्रकारे भीती नाही. पुण्यातही असाच भिजलेला गहू येणार आहे म्हणे, छान ! सरकार या सीझनचा उत्तम प्रकारे उपयोग करून घेत आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या या कटाकक्षतेबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत. ○



## जगातील अत्यंत बलाढ्य देशाला धूळ चारणारी विएतनामी जनता आपला इतिहास आज सुवर्णाक्षरांनी लिहीत आहे.

विएतनाम युद्धाबाबत व गेल्या कांही दिवसात ते युद्ध थांबविण्याच्या दृष्टीने जे काही प्रयत्न सुरू होऊ घातल्याचा भास होत आहे त्याबाबत बऱ्याच विचारवंत लोकात मोठे गैरसमज पसरले आहेत. विएतनाममध्ये शांतता प्रस्थापित होताच अमेरिका तेथून आपले सैन्य काढून घेणार असा असंशय येऊ लागताच ह्या लोकांच्या मनात एक मोठा भीती गंड निर्माण झाला आहे. विएतनाममध्ये साम्य-वाद्यांचे वर्चस्व कायम राहणार असे दिसू लागताच आजूबाजूचे देशही नजीकच्या भविष्यकालात साम्यवादाच्या आहारी जातील व ही मोठीच आपत्ती उद्‌भवेल असे या लोकांना वाटत आहे. विएतनामचा विजय म्हणजे पर्यायाने साम्यवादाचा चीनचाच विजय असे समीकरण घालून कित्येक लोक चिंतेत पडले आहेत. या वैचारिक नव्हे वैकारिक भूमिकेमागे साम्राज्य वादाबद्दल फारच मोठ्या गैरसम-जुती दडलेल्या आहेत. प्रस्तुत लेखात या गैरसमजुतीबद्दल विचार करावयाचा आहे. या विएतनाम प्रकरणाचा इतिहास जर आपण अभ्यासला तर या गैरसमजुती नाहीशा होणे शक्य आहे. म्हणून प्रथमतः हा इतिहास अगदी थोडक्यात पाहू.

## वासुदेव यशवंत कोल्हटकर

दुसऱ्या महायुद्धापूर्वी विएतनाम लाओस व कंबोडिया हे तीनही देश फ्रेंच इंडोचायनामध्ये सामावलेले होते. या महायुद्धात जर्मनीने कांही काल जसा फ्रान्स देश व्यापला होता तसाच फ्रेंच इंडोचायना जपानने व्यापला होता. व फ्रान्सचे विची सरकार जसे जर्मनीचे हस्तक बनले तसे इंडोचायनाचे फ्रेंच वसाहती सरकार जपानचे हस्तक बनले होते. पुढे फ्रेंचांचा आपणावर उलटण्याचा डाव जेव्हा जपान्यांनी ओळखला तेव्हा त्यांचे वसाहती सैन्य व फ्रेंच अम्मलदार या दोघांनाही जपान्यांनी तुरुंगात डांबले व स्थानिक सत्ता आनामचा राजा बाओदाय् याचे स्वाधीन केली. मध्यंतरी जपान्यांविरुद्ध तेथील एतद्देशीय डॉ. हो. ची. मिन्ह ह्यांच्या नेतृत्वाखाली प्रतिकार चळवळ चालू होती व हळूहळू बळकट होत होती, याच चळवळीला विएतमिन्ह असे नाव आहे व तिला अमेरिकन सरकारचा सक्रीय पाठिंबा होता. ही चळवळ विएतनामच्या उत्तर भागात सर्वत्र व दक्षिणेस सर्व ग्रामीण

# विएतनामचा लढा

भागात पसरली होती. पुढे जेव्हा जपानी सैन्याचा पराभव होऊ लागला तेव्हा त्यांनी सर्व विएतनाम मधील राजसत्ता विएतमिन्हच्या हातात सुपूर्त करून पोबारा केला. बाओदायसुद्धा राज्य सोडून हाँगकाँगला पसार झाला. सत्ता हाती येताच विएतमिन्ह यांनी स्वतंत्र प्रजासत्ताक राज्याची घोषणा केली. असे शांततामय सत्तादान इतिहासात आपणांस क्वचितच पाहावयास मिळते. त्याचवेळी जगातील प्रमुख राष्ट्रांनी जर या सरकारला मान्यता दिली असती तर आग्नेय आशियामध्ये एक मक्कम व स्थिर असे सामर्थ्यशाली राष्ट्र तयार झाले असते. तथापि जोपर्यंत जगात साम्राज्यशाही नांदत आहे तोपर्यंत हे कसे शक्य आहे ?

१९४५ च्या पोट्सडॅम कराराप्रमाणे १७ व्या अक्षांशाच्या उत्तरेकडील विएतनामी प्रदेशातील जपानी सैन्य चिनी सरकारने निःशस्त्र करावे व स्वगृही परत पाठवावे आणि दक्षिणेकडल्या जपानी सैन्याला इंग्रजानी निःशस्त्र करून परत पाठवावे असे ठरले होते. त्यावेळी चीनमध्ये चॅंग कै शेकचे राज्य होते. त्याने आपल्या चुनाव प्रांतातील फौजा उत्तर विएतनाममध्ये घुसविल्या व दक्षिणेस ब्रिटिश सैन्य उतरले.

युनान फौजेने जेवढी शक्य होती तेवढी लूट केली पण प्रस्थापित विएतनामी सरकारच्या कारभारात ढवळाढवळ केली नाही. त्या सरकारने उत्तर विएतनाममध्ये आपले पाय भक्कम रोवले होते. ब्रिटिशांनी मात्र डॉ. हो. ची. मिन्ह हा जपान्यांचा हस्तक आहे असे गृहीत धरून त्याच्या सरकारला मान्यता देण्याचे नाकारले. जपानी सैन्याला शक्य तेथे निःशस्त्र केले व लगेच फ्रेंचाना परत बोलावले.

फ्रेंचाना स्वतःचे वसाहती राज्य गमावण्याची मुळीच इच्छा नव्हती. परंतु आपली सत्ता पुन्हा प्रस्थापित करताना अस्तित्वात असलेल्या विएतनामी सरकारला डावलणे शक्य नव्हते. हे सरकार उत्तरेस राज्य करीत होते व दक्षिणेस त्याला मोठ्या प्रमाणावर पाठिंबा होता. अशा स्थितीत जरूर तेथे फसवेगिरी व जरूर तेथे लष्करी बळ वापरण्यास फ्रेंचांनी सुरुवात केली. फ्रेंचांचा मुख्य उद्देश आपले सैन्य उत्तरेस नेण्याचा होता. चिनी सैन्याऐवजी त्यांना तेथे आपले सैन्य ठेवावयाचे होते. म्हणून त्यांनी चुंगकिंग् व हानोई या दोन्ही ठिकाणी वाटाघाटी सुरू केल्या. चिन्यांची सम्मती त्यांनी विकतच घेतली व विएतनामी सरकारास मोठी सवलत दिल्याचा देखावा करून त्यांचीही सम्मती घेतली. ६ मार्च १९४६ ला दोघांमध्य झालेल्या करारात खालील वाक्य आहे ' फ्रेंच सरकार विएतनाम प्रजासत्ताक सरकारला स्वतंत्र, स्वतःचे राज्य, लोकसभा, सैन्य व पैसा असलेले असे इंडोचायनीज संघ राज्याचा भाग म्हणून व फ्रेंच युनियनचा सभासद म्हणून मान्यता देत आहे.' ह्यावरून असे स्पष्ट दिसते की ब्रिटिश कॉमनवेल्थमधल्या घटक सभासदत्वाला जो दर्जा आहे तो हो ची मिन्ह सरकारलाही देण्यात आला. या सहा मार्चच्या करारान्वये हो ची मिन्ह सरकार हेच सबंध विएतनामचे कायदेशीर सरकार आहे असे मान्य झाले होते, व त्यानंतरच्या कोणत्याही घडामोडीने हो ची मिन्ह सरकारची ही कायदेशीर भूमिका तहहयात बदललेली नाही.

## डलेस व डियम

अर्थात फ्रेंचांना स्वतःच केलेला हा करार मुळीच पाळावयाचा नव्हता. करार होताच तो मोडण्याचा त्यांनी ताबडतोब प्रयत्न सुरू केला. हो ची मिन्हला स्वतःचा हस्तक बनवावयाचा, नाही तर त्याला उडवून लावावयाचा असा हा डाव होता. ' आम्ही इंडोचायनात परत येऊ कारण आम्ही बलवत्तर आहोत ' असे जानेवारी १९४६ मध्ये खुद्द चार्लस् ड गॉल साहेब बोलते झाले. ही आपली बढाई खोटी आहे हे समण्यास ड गॉलला आठ वर्षे रखडावे लागले व दियन् बियन् फूचा पराभव सोसावा लागला. याच आठ वर्षांच्या कालात सायगाव सरकारचा गर्भ राहून ते जन्मास आले. प्रथमपासूनच हे अपत्य बेकायदेशीर होते व ते अमेरिकेने जरी दत्तक घेतले तरी ते कायदेशीर ठरत नाही.

हो ची मिन्हला आपला हस्तक करण्यात फ्रेंचांना अपयश आले. ज्या विएतनामी लोकांनी नुकतेच खरेखुरे स्वातंत्र्य मिळविले होते त्यांच्यावर पुन्हा नागडे–उघडे

वसाहती राज्य लादणे अशक्य होते. म्हणून फ्रेंचांनी बाओदायला हाँगकाँगमधून पुन्हा हुडकून काढून राजप्रमुख म्हणून सायगावमध्ये त्याची नेमणूक केली. जून १९४८ मध्ये त्याच्याशी करार केला. ह्या बाओदायने १९४५ च्या जपान्यांच्या शरणागतीनंतर आपण होऊन राज्यत्याग केला होता व आपले जुने मुलकी विन् तुए हे नाव धारण करून तो हाँगकाँगला गेला होता. फ्रेंच्यांच्या बरोबरच्या करारान्वये नव्या विएतमिन्ह प्रजासत्ताकाचा वरिष्ठ सल्लागार ही नेमणूक त्याने मान्य केली परंतु झालेल्या पूर्वेतिहासावर बोळा फिरवून त्याला पुन्हा राज्यकर्ता बनविणे अशक्य आहे ही गोष्ट अमेरिकन सरकार जाणून होते. एन् गो डिन् डियम् ह्या वजनदार गृहस्थानें जपानी आधारावर स्थापलेल्या बाओदायच्या सरकारात वरची जागा मिळण्यासाठी बरीच धडपड केली होती. पण ती फसली. त्यानंतर तो अमेरिकेत गेला व तेथील सरकारशी घट्ट संधान बांधून बाओदायच्या राज्यात मुख्य प्रधान म्हणून त्याने जागा पटकावली. १९५४ च्या जिनोव्हा कराराचे वेळी जेव्हा फ्रेंच शरण आले तेव्हाच एन् गो डियम् हा अमेरिकेचा मुख्य हस्तक सायगावच्या सरकारात उच्च अधिकारावर होता. त्यानंतर जॉन फॉस्टर डलेस व डियम या दोघांनी बाओदायचे दिवस संपले असे समजून त्याच्याऐवजी डियम याला राज प्रमुख करण्याबद्दल राष्ट्रीय म्हणजे दक्षिण विएतनाममधे कौल घेतला व डियमने विएतनामचे प्रजासत्ताक राज्य जाहीर करून स्वतःला प्रमुख म्हणून जाहीर केले. या कौलात अवघ्या १५ टक्के मतदारांनीही भाग घेतला नव्हता. फ्रेंचाच्या पाडावानंतर डॉ. हो-ची-मिन्हकडे सर्व देशांतील खरी सत्ता होती हे उघड आहे. आयसन हॉवरने ही गोष्ट मान्य केली होती. १६ फेब्रुवारी १९६५ च्या न्यूयॉर्क पोस्टच्या अंकात मार्किस चाइल्डने ही गोष्ट स्पष्ट केली आहे. मँडेट फॉर चेंज या पुस्तकात आयसेन हॉवर म्हणतो की त्या वेळी (म्हणजे १९५६ साली) हो-ची-मिन्हची निवडणूक लढविली गेली असती तर ८० टक्के मते त्यालाच पडली असती. बाओदाय अथवा डियम यापैकी कोणालाही विएतनामचा राजप्रमुख होण्याचा काडीमात्र हक्क नव्हता. यावरून विएतनामच्या कायदेशीर सरकारला आपण मदत करीत आहोत हे अमेरिकेचे वक्तव्य किती धादान्त खोटे आहे हे स्पष्ट होते.

## जिनिव्हा करार

वरील हकीकत लक्षात आली म्हणजे उत्तर विएतनाम सरकार हे १९५४ चा जिनिव्हा करार मोडत आहे व दक्षिण विएतनामवर चढाई करीत आहे हा आरोपही अक्षरशः खोटा आहे हेही समजणे मुळीच कठीण नाही. जिनिव्हा करार ज्यांनी वाचला असेल त्यांना तो करार, सर्व विएतनाम उत्तर–दक्षिण दोन्ही भागात सार्वत्रिक निवडणुका घेऊन प्रस्थापित झालेल्या सरकारच्या अमलाखाली एकत्र यावा, एवढ्याकरता केला, हे सहज समजून येईल. या निवडणुका १९५६ साली सर्व

विएतनाममध्ये व्हावयाच्या होत्या. परंतु डलेस व डियम यांनी हे जिनिव्हा करारातले कलम धुडकावून लावले. अमेरिकेने या करारावर सही केलेली नव्हती तेव्हा तिने तो करार धुडकावून लावला हे आपण समजू शकतो. परंतु याच कराराकडे बोट दाखवून डियमचे व त्यानंतरचे सरकार हे कायदेशीर आहे असे अमेरिकेचे म्हणणे किती उर्मटपणाचे आहे व हास्यास्पद हे स्पष्ट होते. जिनिव्हा करारामध्ये उत्तर विएतनामने दक्षिण विएतनाममध्ये येऊ नये असे कोठेही म्हटलेले नाही. उलट सर्व विएतनाम एकच आहे अशी त्या कराराची ग्वाही आहे. परकीयांनी तेथन बाहेर जावे व पुन्हा आत येऊ नये अशी कराराची अट आहे. देशाचे १७ व्या अक्षांश रेषेने दोन भाग केले ते केवळ तात्पुरते होते व ते फक्त युद्ध थांबविण्यासाठी व सैनिकांना युद्धातून काढून घेण्यासाठी केले होते. सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर हे भाग वेगळे राहावयाचे नव्हते. दरम्यान सर्व परकीय फौजा काढून घ्यावयाच्या होत्या, व यापुढे बाहेरून शस्त्रास्त्रे आणावयाची नाहीत अशी करारात अट होती. कराराने सर्व देशाची एकी पूर्णपणे मान्य केली होती.

## अमेरिकेचा दावा

अमेरिकेचा आणखी एक दावा असा, की आपण जर आपले सैन्य विएतनाममधून काढून घेतले तर चीन विएतनाम बळकावून बसेल. हेही एक महाभयंकर असत्य आहे. हो-ची-मिन्हचे सरकार चिनी क्रांती होण्यापूर्वी चार वर्षे प्रस्थापित झाले होते. व तेथपासून आठ वर्षे ते फ्रेंचांशी लढत होते. हो-ची-मिन्ह हा कोणाचाही हस्तक नाही हे फ्रेंच लोकांना पूर्णपणे माहीत आहे. विएतनामचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याकरता चिनी टपलेले आहेत या म्हणण्याला तिळाएवढासुद्धा पुरावा उपलब्ध नाही. अर्थात अमेरिकेने उत्तर विएतनामवर जर स्वारी केली तर चिनी लोक खात्रीने त्यांच्या मदतीला धावून येतील. तसे ते उत्तर कोरियाच्या मदतीलाही धावून गेले होते. पण युद्ध संपताच एकही चिनी सैनिक उत्तर कोरियात राहिलेला नाही. या उलट दक्षिण कोरियात अमेरिकन सैन्य कायम वास्तव्य करीत आहे ! !

युद्ध का व कोणी सुरू केले याबद्दल अमेरिकन सरकारने केलेले निवेदन इतके हास्यास्पद आहे की त्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. हे निवेदन म्हणते की दक्षिण विएतनामचा अमेरिकन साहाय्याने होणारा उत्कर्ष डॉ. हो-ची-मिन्हला सहन झाला नाही म्हणून त्याने युद्ध सुरू केले ! ! उत्तर व दक्षिण भागांच्या आर्थिक प्रगतीबद्दल जी माहिती उपलब्ध आहे त्यावरून उत्तर विएतनामचे लोक दक्षिण विएतनामी लोकांपेक्षा कितीतरी सुखी आहेत,–होते, असे स्पष्ट दिसते. परंतु हातच्या कांकणाला आरसा कशाला ? दोन्ही भागांमधला जो कृत्रिम अडसर आहे तो काढून टाका व खुल्या निवडणुकीने तेथील जनतेलाच काय ते ठरवू द्या. जिनिव्हा करारात हेच ठरले होते. हानोई हेच मागत आहे पण सायगावला ते पसंत नाही. त्याचा उच्चार करणे हासुद्धा कायद्याने गुन्हा ठरविला आहे. फ्रेंचांच्याबरोबर



जनतेची प्रखर प्रतिकारशक्ती

आठ वर्षे चाललेल्या युद्धकालात सर्व विएतनाममध्ये खरीखुरी समाजक्रांती होत होती. सर्व ग्रामीण भागात विएतमिन्हची सत्ता होती. मोठमोठे जमीनदार खेडी सोडून संरक्षणार्थ फ्रेंचांच्या तोफांमागे शहरात जाऊन राहिले होते. किसानांनी विएतमिन्हच्या साहाय्याने ग्रामीण भागात आपले राज्य स्थापून जमीनदारांच्या मोठमोठ्या जमिनी किसानात वाटून दिल्या होत्या. जुने खंड रद्द करण्यात आले होते. कर काढून टाकण्यात आले होते. नव्या तऱ्हेची सहकारी चळवळ सुरू झाली होती. जिनिव्हा करारावर सह्या झाल्यानंतर विएतमिन्हच्या फौजा उत्तरेत गेल्या व फ्रेंच व त्यांच्या हस्तक सेना निवडणुका होईपर्यंत दक्षिणेस राहाव्या असे ठरले होते. तथापि थोडक्याच दिवसांत फ्रेंचाचे हस्तक अमेरिकेचे हस्तक बनले. त्यांना जिनिव्हा करार मुळीच पाळावयाचा नव्हता. (त्यांना म्हणजे डलेस व डियम यांना). डियमने उत्तरेकडील प्रतिगामी कॅथॉलिक निर्वासितांचा नोकऱ्यात भरणा केला, दक्षिणेकडील जमिनी गमावलेल्या जमीनदारांचाही नोकऱ्यात भरणा केला व त्यांच्या करवी भयंकर दडपशाही सुरू केली. ग्रामीण भागात राष्ट्रवाद्यांना व क्रांतिकारकांना तुरुंगात डांबून त्यांचे शारीरिक हाल करून कित्येकांचे खून केले. जमिनी पुन्हा जुन्या जमीनदारांना देण्यात आल्या. अधिकाराच्या जागी बदमाष ठकांना नेमण्यात आले. फिलिपडेविलर्स (हा कॅथॉलिक व कम्युनिष्ट विरोधी म्हणून नावाजलेला आहे) हा विएतनामच्या इतिहासाचा एक तज्ज्ञ समजला जातो. तो लिहितो ' एक विशिष्ट कार्यपद्धती ठरून गेली होती. धिक्कार (क्रांतिकारकांचा), खेड्यांना वेढा,

झडत्या, छापे, संशयितांची पकड, लूट, शारीरिक हाल (निरपराध्यांचेसुद्धा), हद्दपारी व लोकवस्तीची स्थलांतरे (विशेषत: जे क्रांतिकारकांना सामील आहेत अश संशयितांचे) हा नेहमीचा कार्यक्रम होता. या सर्व गोष्टी अमेरिकेने जगापासून झाकून ठेवल्या आहेत.

अमेरिकन वर्चस्व स्थापन झाल्यानंतर वूल्फ लॅडेजिन्स्की याने जमीन मालकी सुधारणेचा आराखडा तयार केला व तो अमलात आणण्यात आला. या सुधारणा कायद्यान्वये पूर्वीच्या जमीनदारांना २४५ एकरांपर्यंत स्वत:च्या मालकीची जमीन स्वत:साठी राखण्यास परवानगी देण्यात आली. त्या शिवाय धर्मकार्याकरता आणखीही जमीन मिळण्याची त्यांना सवलत देण्यात आली. उर्वरित खासगी जमिनी सरकारने घेताना जमीनदाराला मोबदला द्यावयाचा होता. हा मोबदला १० टक्के रोख पैशात व उरलेला सरकारी कर्जरोख्यात देण्यात येत असे. जमीन खंड ४०-५० टक्क्यांपासून १५–२५ टक्क्यांपर्यंत उतरविण्यात आला. कर्जावरचे व्याज, जनावरे, अवजारे वगैरेवरचे भाडे १२ टक्क्यांपर्यंत ठरविण्यात आले.

वरील ' सुधारणांची ' हो-ची-मिन्हच्या क्रांतिकारी सुधारणांशी तुलना करता त्या किती प्रतिगामी आहेत हे स्पष्ट होते. किसानांनी त्यांना जोराचा विरोध केला. १५ एप्रिल १९५५ चा न्यूयॉर्क टाइम्स म्हणतो 'या सुधारणा दक्षिण विएतनाममध्ये कुळापेक्षा जमीनदारांनाच जास्त आवडल्या.' शेतकी सुधारणा समित्या नमण्यात आल्या पण त्यावर एकही कूळ निवडून येण्यास तयार झाले नाही. किसानांनी पूर्वीसारखी आपली शस्त्रे परजून सरकारचा प्रतिकार करण्यास सुरुवात केली. दक्षिण विएतनाममध्ये यादवी सुरू झाली ती अशी. डॉ. हो-ची-मिन्हने दक्षिणेचा हेवा वाटून दक्षिणेवर आक्रमण केले हा दावा एक निर्लज्ज असत्य आहे. दक्षिण विएतनामी युद्धाची कथा ही अशी आहे. अशा परिस्थितीत उत्तरेकडच्या जनतेने आपल्या दक्षिणेकडील बांधवांस मदत केली तर त्यात वावगे असे काहीच नाही. पूर्व पश्चिम जर्मनी एक झाले पाहिजेत असा प्रदीर्घ आक्रोश करणाऱ्यांना उत्तर दक्षिण कोरिया अगर उत्तर दक्षिण विएतनाम एक व्हावे असे वाटत नाही. महाराष्ट्राच्या फाळणीविरुद्ध ते लढू शकतात पण उत्तर–दक्षिण विएतनाम हे एक राष्ट्र आहे हे या मतिमंदांच्या लक्षात कसे येत नाही ?

## युद्धकथा

गेली १२ वर्षे चाललेल्या या युद्धात अमेरिकेला कोणताच विजय मिळालेला नाही. दक्षिण विएतनामी जनता (विएतकाँग) ही गनिमी युद्ध खेळते, म्हणून त्यांना जय मिळतो असे काही लोक समजतात. पण अमेरिकन सैन्याला गनिमी युद्ध तुम्ही खेळू नका असे कोणी सांगितले ? विएतकाँग गनिमी युद्ध करतात म्हणून ते यशस्वी होतात, हे खोटे आहे. ते यशस्वी होतात याचे ढळढळीत कारण म्हणजे आम दक्षिण विएतनामी जनतेचा त्यांना पाठिंबा आहे, सक्रिय मदत आहे म्हणून

होतात. विएतकाँगना रशिया व चीनची मदत मिळते म्हणून ते यशस्वी होतात, हेही तितकेच खोटे आहे. इजिप्तला रशियाने थोडी का मदत केली होती? पण चार दिवसांत नासरचा धुव्वा उडाला. अमेरिकेच्या विएतनाम युद्धात आकाशी वर्चस्व अमेरिकेकडे आहे. विएतकाँग अगर उत्तरेचे सैन्य यांनी कधी बॉम्बर्स वापरली असे कोठेही ऐकिवात नाही. नाविक दलाचे तसेच आहे. रशियाजवळ असलेली अजस्र व भयानक शस्त्रे अजूनही विएतनामच्या युद्धात उत्तर विएतनामी सैन्याने वापरलेली दिसत नाहीत. ज्यांच्याबद्दल उल्लेख केला जातो, अशी तीन शस्त्रे आहेत व ती म्हणजे रॉकेट्स, तोफा व मॉर्टर्स. याउलट अमेरिकेने सर्व प्रकारची अत्यंत भयानक शस्त्रे वापरली आहेत. विषारी वायूसुद्धा वापरला आहे. अशा परिस्थितीत शस्त्र-संभारदृष्ट्या विएतनाम जनता समृद्ध आहे असे कोण म्हणेल? तरीही दक्षिण विएतनामी जनतेचा प्रतिकार इतका प्रभावी ठरला आहे की, अमेरिकेला हे युद्ध केव्हाही, कधीही जिंकता येणार नाही, हे खुद्द अमेरिकन जनतेला आता पूर्णपणे पटलेले आहे. तरीसुद्धा या युद्धाबद्दल अगदी धादांत खोटी विधाने करण्यात येतात व भारतीय लोक त्यावर विश्वास ठेवतात. अशा १०० टक्के खोटया विधानांपैकी काहींची चर्चा करणे जरूर आहे.

१ : युद्धात मृत्यू पावलेल्या व जखमी झालेल्या अमेरिकन सैनिकांची व त्यांच्या हस्तक सैनिकांची संख्या नेहमी अगदी कमी दिलेली असते. त्याच्या उलट विएतकाँग व उत्तर विएतनामी सैनिकांची संख्या प्रचंड दर्शविली जाते. वस्तुस्थिती याच्या अगदी उलटी असते, हे सर्व अमेरिकन लोकांना आता पूर्णपणे कळून चुकले आहे. न्यूयॉर्क टाईम्सनेसुद्धा याबद्दल माहिती दिलेली आहे. ब्रिटिश व फ्रेंच पत्रांमधून याबद्दल कित्येक वेळा उल्लेख केलेला आढळतो.

२ : टेट सणाचे दिवसांत नेहमी पाळण्यात येणारी शांतता विएतकाँगनी मोडून बेसावध जनतेवर व सैन्यावर हल्ले करून काही विजय मिळविले असे बशरम असत्य सांगण्यात येते. वस्तुतः टेट सणाचे दिवसांत यंदा शांतता पाळावयाची नाही असे खुद्द सायगावच्या हस्तक सरकारने सरकारीरीत्या जाहीर केले होते व ही जाहीर बातमी सर्व मोठ्या दैनिकांतून प्रसिद्ध झालेली होती.

३ : खे सान्चा वेढा व अमेरिकन मरीन्सची कोंडी अमेरिकन सैन्याने फोडली व या कार्यात त्याला विएतकाँगची कितीतरी शस्त्रास्त्रे व दारूगोळा हस्तगत झाला अशी सपशेल खोटी बातमी प्रसिद्ध करण्यात आली आहे. हा वेढा उत्तर विएतनामी सैन्याने जॉन्सन्च्या शांततेबद्दलच्या भाषणानंतर आपण होऊन एका बाजूला उघडला होता. हे ब्रिटिश वर्तमानपत्रांनी कित्येक वेळा उल्लेखलेले होते. अमेरिकन् सैन्य या उघडलेल्या फळीतून मोठ्या प्रमाणावर आत शिरले. दरम्यान लिंडन जॉन्सन्ची विश्वासघातकी वागणूक स्पष्ट झाली. त्याबरोबर ही कोंडी पुन्हा बंद करण्यात आली.

४ : वीस अक्षांशाच्या बाहेर व लोकवस्ती असलेल्या ठिकाणी बॉम्बहल्ले न करण्याचे घोषित झालें होते. जाहीर घोषणा केल्यानंतरही लोकवस्तीवरचे बॉम्बहल्ले थांबले तर नाहीतच उलट त्यांचे प्रमाण भयंकर वाढले आहे व अधूनमधून वीस अक्षांशापलीकडेही हल्लें होत आहेत. फसवेगिरी करून विएटनामी जनतेला बेसावध करण्याचा हा जॉन्सन्‌चा खुनशी डाव कधीही तडीस जाणार नाही. सध्या जरी वीस अक्षांशाच्या पलीकडे बॉम्बहल्ले होत नसले तरी त्याच्या अलीकडल्या टापूत पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने मोठे हल्ले होत आहेत.

५ : कोणत्याही स्थळी व काळी शांततेसाठी वाटाघाटीस तयार आहोत असे म्हणणारे जॉन्सन्‌ आता सर्व तऱ्हेच्या अटी घालत आहेत. सुरुवातीच्या वाटाघाटीच्या स्थलाबद्दलही अजून एकमत होत नाही ते यामुळेच. यावरून घडपणे शांततेची बोलणी होणार नाहीत हे उघड आहे. त्याचप्रमाणे अमेरिकेचा व तिच्या साथीदारांचा एकूण एक सैनिक ज्या दिवशी मारला जाईल अगर विएतनाम बाहेर फेकला जाईल त्याच दिवशी युद्धाची समाप्ती होईल.

विएतनामी जनतेच्या बहादुरीला उभ्या जगात कोठेही तोड नाही. आजपर्यंत जगात इतकी बहादुरी कोणीही केलेली नाही. जगातील अत्यंत बलाढ्य देशाला धूळ चारणारी विएतनामी जनता आपला इतिहास सुवर्णाक्षरांनी आज लिहीत आहे. त्यांनी आपल्या रक्ताने व शौर्याने लिहिलेला इतिहास कधीही पुसला जाणार नाही.

## विएतनामी युद्धाचे महत्त्व

जुन्या साम्राज्यशाही सत्ता ज्या ज्या देशांतून नष्ट झाल्या त्या त्या ठिकाणी अमेरिका घुसण्याचा प्रयत्न करीत आहे. अर्थात जुन्या तऱ्हेची राजवट ह्या देशात पुन्हा प्रस्थापित करणे अशक्य आहे. परंतु अमेरिकेने नव वसाहतवादी तंत्र तयार केले आहे. मागासलेल्या ह्या सर्व देशांमध्ये त्यांना साधी भांडवलशाही लोकसत्तात्मक राजवटसुद्धा नको आहे, म्हणून काँगो, डोमिनिकन रिपब्लिक वगैरे ठिकाणी त्यांनी ती उलथून पाडण्याकरता सैन्य घुसविले. इतर ठिकाणी प्रतिगामी लष्करी राजवट प्रस्थापून तिच्यामार्फत आपणास लागतील त्या सवलती मिळविल्या आहेत. विएतनाममध्येही असेच परिवर्तन घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

विएतनाम भूमी ही खनिज संपत्तीने व इतर दृष्टीनेही अमेरिकन भांडवलदारांना हवी आहे. त्याचबरोबर विएतनाम देश लष्करीदृष्टया अगदी मोक्याच्या जागी आहे. उत्तरेस चीन व जपान, पश्चिमेस भारत व दक्षिणेस इंडोनेशिया, मलाया ऑस्ट्रेलिया वगैरे प्रदेश आहे. विएतनाम प्रदेश या सर्व प्रदेशांना मध्यवर्ती असा आहे. तेथल्या लष्करी व नाविक छावणीच्या भोवतीच्या सर्व प्रदेशावर नजर ठेवण्यास व प्रसंगी हस्तक्षेप करण्यास सोईस्कर आहे म्हणून अमेरिकेची धडपड चालू आहे.

विएतनाममध्ये साम्राज्यशाहीला जो जबरदस्त तडाखा बसला त्यामुळे तेथील फ्रेंच सत्ता कोलमडून पडली. जनतेची साम्राज्यशाही विरुद्धची जी प्रतिकारशक्ती विएतनाममध्ये अनुभवास आली तशी अल्जीरियाखेरीज इतर कोठेही आली नाही. मुक्तियुद्धासाठी वापरलेले येथले डावपेच अत्यंत प्रभावी ठरले. अमेरिका या जनशक्तीवर मात करण्याची सारखी धडपड करीत आहे. सर्व तऱ्हेची आधुनिक शस्त्रास्त्रे वापरून पहात आहे. विएतनामी वीरांना शारीरिक यमयातना भोगावयास लावीत आहे. त्यांच्यावर बॉम्बसचा पाऊस पाडीत आहे. उद्देश हा, की येथे ज यंत्र व तंत्र उपयोगी पडेल, मुक्तिसेनेचा पराजय करू शकेल तेच इतरत्र वापरण्यास सोपे जाईल. विएतनामही आधुनिक शस्त्रांची व युद्धनीतीची प्रयोगभूमी म्हणून अमेरिका वापरीत आहे. जागतिक प्रभुत्वाची ही आसुरी लालसा आहे. साम्राज्य वाढविण्याची ही अनावर तृष्णा आहे. आपल्या संपत्तीचा व लष्करी सामर्थ्याचा हा मद आहे. याच पाशवी व निर्घृण सामर्थ्याला विएतनामी जनता अक्षरशः खडे चारीत आहे. येथे अमेरिकेचा पराभव झाला तर जगातल्या कोणत्याही प्रतिगामी राजवटी अमेरिकेवर अवलंबून राहणार नाहीत. अमेरिकन नववसाहतवाद फलद्रुप होणार नाही. जागतिक युद्धेही होणार नाहीत. जगातील प्रतिगामी शक्तींचा पराभव होईल. म्हणूनच विएतनामचे युद्ध हे भांडवलशाही साम्राज्यवादाविरुद्ध निर्णायक असे युद्ध आहे. यात तडजोड नाही. झाली तरी ती तात्पुरती होईल. विएतनामी जनता जगाचे भवितव्य ठरवील. पुढील हजार वर्षांचा इतिहास येथेच ठरणार आहे.

## विएतनाम व भारत

उत्तर विएतनाम आज २२ वर्षे साम्यवादी राजवटीखाली आहे. या देशापासून भारतास कोणत्याही प्रकारचा त्रास झालेला नाही. उत्तर–दक्षिण विएतनाम एक व्हावेत अशी जिनिव्हा करारावर १९५४ साली ज्या ज्या देशांनी सही केली त्या सर्वांची इच्छा होती. आजही दक्षिण विएतनाममधील चार पंचमांश प्रदेश विएत-


उत्कृष्ट इन्‌-डोअर व औट-डोअर फोटोग्राफीसाठी संपर्क साधा

**साधना फोटो स्टुडिओ**

सोन्या मारुती चौक, लक्ष्मी रोड, पुणे २

फोन : २६४०१

कांगच्या वर्चस्वाखाली आहेत. या देशांपासून भारताला कोणत्याही तऱ्हेचा—लष्करी अगर वैचारिक—धोका नाही. असे असूनही आपण या युद्धामध्ये चढाईखोर कोण व कुणाच्या स्वातंत्र्याची पायमल्ली होत आहे या दोन्ही प्रश्नांचा विचार करीत नाही. आपल्या एकंदर भूमिकेत आपण युद्धाबद्दल दोन्ही बाजूंना रोष देत आलो आहोत. ही भूमिका मूलत: अन्यायी आहे. परंतु अमेरिकेकडे उठल्या—सुटल्या भीक मागणाऱ्या आपल्या सरकारला खंबीर भूमिका घेणे अशक्य झाले आहे. उत्तर व दक्षिण कोरियामध्ये युद्ध झाले त्या वेळेही अमेरिकेने सगळ्या जगाची दिशाभूल करून उत्तर कोरियाने दक्षिणेवर स्वारी केली असे भासविले. ऐतिहासिक सत्य बाहेर पडल्यावरसुद्धा आपल्या सरकारने वस्तुस्थिती जनतेपुढे मांडली नाही. लाचारीचे यापेक्षा जास्त ढळढळीत दुसरे उदाहरण कोणचे ? भारतीय जनतेला वस्तुस्थिती कळव द्यावयाचे नाही म्हणून आपल्या देशातील वृत्तपत्रे अटोकाट प्रयत्न करीत असतात. त्यामुळे लोकांची दिशाभूल झालेली आहे. भारतसरकार अमेरिकेला संतुष्ट करण्यासाठी उत्तर विएतनामबरोबर व्यापारही करीत नाही. हे दुर्दैव आहे. विएतनामवर साम्यवादी राजवट आली म्हणून भारताचे काडीमात्र नुकसान होणार नाही. साम्यवाद वळावतो तो साम्यवाद आक्रमक आहे म्हणून नव्हे. धनिकशाही समाज व्यवस्थेत जनतेचा अध:पात होतो, आर्थिक व नैतिकदृष्ट्या जनता भ्रष्ट होत जाते म्हणूनच जनता धनिकशाहीविरुद्ध बंड करते. साम्यवादी भाई, जनतेच्या कानात क्रांतिकारी ' गरळ ' ओततात म्हणून नव्हे, ही साधी गोष्ट अमेरिकन सत्ताधाऱ्यांना समजत नाही. नव्हे समजून घ्यायची नाही. आपलाही दृष्टिकोन अमेरिकन सत्ताधाऱ्यांपेक्षा वेगळा नाही. ○

[ या लेखातील ऐतिहासिक माहिती अमेरिकन Monthly Review (New-York) या मासिकाच्या अंकातून गोळा केली आहे. ]




# जुलै महिन्यातच

1968

June

| SUN | MON | TUE | WED | THU | FRI | SAT |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

July

| SUN | MON | TUE | WED | THU | FRI | SAT |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

August

| SUN | MON | TUE | WED | THU | FRI | SAT |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

# युनिट्स किमान किंमतीस विकत घ्या!

युनिट्स ऑर्डीला जुलैत भरती येते. कारण तेव्हा युनिट्सच्या किंमती सर्वात कमी असतात. किमान किंमतीच्या ह्या खास सवलतीचा फायदा जरूर करून घ्या. युनिट्स ऑर्डी ही देशातील सर्वोत्तम गुंतवणूक होय. त्यांच्यापासून— भरपूर मोबदला, भांडवलाची सुरक्षितता, रोकडमध्ये रूपांतर करण्याची मुभा, करविषयक सवलती (त्यांच्यावरील रु० १००० पर्यंतची प्राप्ती करमाफ असते.) इतके फायदे मिळतात.

युनिट्स विकत घेणे सोपे असते. देशातील १४,००० टपाल कचेऱ्या आणि प्रमुख बँकांच्या ४,००० शाखा यांच्यामधून सध्या त्यांची विक्री चालू आहे. तसेच ते एजंट्स व स्टॉक ब्रोकर्स यांच्यांकडूनही मिळतात.

**युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया**

मुंबई · दिल्ली · कलकत्ता · मद्रास

# आस्वाद

" देवा पाहन तारीअले ।। राम कहत जन कसन तरे ।। १ ।।
तारीले गनिका बिनरुप कुबिजा । बिआधि अजाजलु तारीअले ।।
चरन बधिक जन तेऊ मुकति भए । हउ बलिबलि जिन राम कहे ।। १ ।।
दासीसुत जनु बिदक सुदामा । उग्रसैन कउ राजदीए ।।
जपहीन, तपहीन, कुलहीन, क्रमहीन । नामके सुआमी तेऊ तरे ।। २ ।। "

ईश्वराच्या नामस्मरणाविषयीची अपूर्वाई या हिंदी अभंगात नामदेवांनी अगदी मनापासून सांगितलेली आहे. नामस्मरणाविषयीची त्यांची स्वतःची निष्ठा आणि नामस्मरणाच्या महतीची व्यवहारातली उदाहरणे यांचा मनोज्ञ संयोग या अभंगामध्ये झालेला आहे.

'देवा, तुम्ही पाषाण तारलेत, मग रामनाम घेणारे लोक का तरून जाणार नाहीत," अशी भावना नामदेव प्रारंभीच व्यक्त करतात. लंकेसाठी समुद्रावर सेतू बांधताना टाकलेले मोठमोठे शिलाखंड केवळ रामनामाच्या प्रभावामुळे तरंगू लागले, या आख्यायिकेचा निर्देश या चरणामध्ये आहे. ("श्री रघुबीर प्रताप ते सिंधु तरे पाषान"–तुलसीरामायण). अशा तऱ्हेचे पत्थरांना पाण्यावर तरावयास लावण्याचे सामर्थ्य रामनामामध्ये आहे; मग या रामनामाचा जप करणारे मानव संसारसागरावरून तरून जाणे अगदी साहजिक आहे. अशा तऱ्हेने तरून जाणाऱ्या मानवांची उदाहरणेही नामदेवांनी दिलेली आहेत. ते म्हणतात, "तुम्ही वेश्येला तारलेत. कुरूप कुब्जा, व्याध, अजामिळ यांना तुम्ही तारलेत. फार काय, पायावर शरसंधान करणाऱ्यालाही तुम्ही मुक्ती दिलीत !" ही सारी उदाहरणे फार बोलकी आहेत. देवाच्या दरबारात लौकिक कर्मांचे महत्व काहीही नाही. लौकिक रूपाचे तर नाहीच नाही. कान्होपात्रेसारखी वेश्या किंवा कुब्जेसारखी कुरूप दासी तेथे 'भक्त' या एकाच विशेषणाने ओळखली जाते. व्याधासारख्या हिंस्राचारीसुद्धा अंतरी देवाचा दास असू शकतो. एवढेच नव्हे, तर जन्मभर खलत्व करून अंती अन्य मिषाने हरिनाम घेणारा अजामीळही उद्धरून जातो. प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या चरणाचा वेध करणाऱ्या पारध्याचेही लौकिक कर्म न पाहता, अंतरीचा भाव जाणून श्रीकृष्ण त्याला

मुक्ती देतो. सर्वत्र महत्त्व एका नामस्मरणाचे. या नाममहात्म्याने प्रभावित झालेले नामदेव मनापासून उद्‌गारतात, " हउ बलिबलि जिन राम कहे "–जे रामनाम घेतात त्यांच्यावरून मी माझी काया ओवाळून टाकतो ! ' जीवें लिंबलोण करीन त्यासी '! दासीपुत्र विदुर, सुदामा, उग्रसेन यांना तर राजवैभवाचा लाभ झाला. काय त्यांची व्यावहारिक योग्यता होती ? पण नामस्मरणाचे ऐहिक फलही त्यांना मिळाले. जपहीन, तपहीन, कुलहीन, आचारहीन अशा लोकांनासुद्धा नामदेवाच्या स्वामीन तरून गेले, मग मला कसे तारणार नाही, असा विश्वास नामदेवांनी शेवटी प्रकट केला आहे.

नामस्मरणावरील अपार निष्ठा या अभंगात साकार झाली आहे. येथे दिलेली विविध व्यावहारिक उदाहरणे ही आपल्या विधानाच्या पुष्टचर्थ वादपटुत्वाने दिलेली नाहीत. मन भरून नाममहात्म्य सांगताना ती आपोआप पाझरलेली आहेत. त्या सर्व गोष्टींवर गोष्टींवर नामदेवांची पूर्ण श्रद्धा आहे. त्यामुळे पाषाणसुद्धा पाण्यावर तरंगण्याचे सामर्थ्य पाहून वाटलेला पराकाष्ठेचा विस्मय आणि त्याचाच समांतर परिणाम म्हणून आपल्या जीवनोद्धाराविषयी मनाला वाटणारा दिलासा यांचे सार्द्र संमीलन या अभंगामध्ये झालेले दिसून येते. नामस्मरण करणाऱ्यांचेवरून जीवांचे निंबलोण उतरविण्याची उत्कंठा ही या सार्द्रतेच्या तीव्र परिसीमेचेच दृश्य रूप आहे. नामाचे हे माहात्म्य पाहून नामदेव इतके अधीर होतात की त्याचा गौरव करण्यासाठी आपले जीवीत्वही त्यांना उधळून टाकावेसे वाटते. भक्ताच्या एकनिष्ठ प्रेमाचा हा आविष्कार आहे. समुद्रावर पाषाण तरणे आणि भवसागरात मानव तरणे यांमध्येही बिंबप्रतिबिंबभाव केवळ नाही. औपम्यही नाही. दोन्ही गोष्टी नामदेवांच्या लेखी एकाच पातळीवरच्या. त्यांची श्रद्धा अभंग राहते ती या धारणेमुळेच.

–रसिक

पाहन =पाषाण; हउ =होऊ (मराठी रूपाचे हिंदीकरण)
विदरु =विदुर; कउ =को, ला (द्वितीयेचा प्रत्यय)

नामदेवांची हिंदी भाषा ही व्याकरणशुद्ध हिंदी नाही. कसलेही शिक्षण न घेता केवळ हिंदी प्रदेशातील वास्तव्यामुळे बाराव्या शतकात एका मराठी संताने आत्मसात केलेली ही हिंदी आहे. तीत अर्धमराठी रूपे कितीतरी सापडतात. किंबहुना प्रस्तुत अभंग इकडच्या नामदेवाचेच आहेत हे सिद्ध करणारा तो एक पुरावाही आहे.

पहाटेचे चार वाजले होते. नुक्तचं तांबडं फुटत होतं. आळस झटकून मी स्लीपिंग बॅगमधून बाहेर आलो. सहज उत्तरेकडे नजर गेली. बर्फाच्या एका उत्तुंग पिरॅमिडने माझी नजर अडविली. त्याच्या भोवतीची बाकीची शिखरे अगदीच ठेंगणी वाटत होती. त्याचे विशाल बाहू दूरवर पसरले होते. सूर्याच्या उन्हात लकाकणारे त्याचे मस्तक म्हणजे एक प्रचंड स्फटिक आहे असे भासत होते.

" धवलगिरी, धवलगिरी ! " मी ओरडत येऊन सर्वांना उठविलं. सर्वजण धावत बाहेर पडलो. त्या पर्वतराजाने आपल्या भव्यतेने सर्वांना भारून टाकलं. मला १९५० सालच्या फ्रेंच गिर्यारोहण मोहिमेची आठवण झाली. धवलगिरीच्या प्रथम दर्शनाने त्यांची छाती अशीच दडपून गेली होती.

" अभी यहांसे तातपानी कितना दूर है ?" वाटेत भेटलेल्या पहिल्याच माणसाला बडव्यांनी विचारलं.

" दो कोस ! " या लोकांचे दो कोस कधी संपतच नव्हते. " कोस याने कितना मील ?" मी धाडस करून विचारलं.

# अन्नपूर्णा

" अरे भाई ! इन लोगोंका कोस ऐसाही होता है । " मग त्याने आम्हाला कोसाची व्याख्या सांगितली. हातात गवताचं पातं धरून चालायला लागायचं. ते पातं जियं वाळायला सुरुवात होईल, ते अंतर म्हणजे कोस !' मी कपाळाला हात लावला. तरीच यांचा कोस कधी संपत नव्हता.

एक खिंड ओलांडल्यावर खोल खाली आम्हांला कृष्ण गंडकी दिसली. आता आमचा मार्ग गंडकीने निर्माण केलेल्या घळईतून जात होता. तिच्या तीरावरील तातपानी गावी पोचण्यासाठी अजून दोन सिंहगड उतरून जाणे भाग होते. तातपानी म्हणजे गरम पाणी. येथे गरम पाण्याचे झरे आहेत. नदीचं पाणी बर्फासारखं गार पण तिच्या प्रवाहापासून २५ फुटांवर असलेल्या झऱ्याचं इतकं गरम की अंगावर घेववत नाही.

गंडकी नदीवरचा झुलता पूल ओलांडून आम्ही पुढे निघालो आणि झपाझप चालत दुपारी तीन वाजता दाना गाठलं. दाना हे या भागातील मुख्य गाव. येथे शासकीय कार्यालये, पोलिसांचे ठाणे, व न्यायालय आहे. इथल्या बाजाराबद्दल आम्ही बरेच ऐकले होते. पण तो बहुतेक बंदच होता.

" इधर पुराना अखबार मिलेगा ? " वनस्पतींचे नमुने 'प्रेस' करण्यासाठी वर्तकांना रद्दीची सतत आवश्यकता भासे. दानामध्ये रद्दी नक्की मिळेल असे समजल्यामुळे त्यांनी चौकशीस सुरुवात केली. शेवटी एका सरकारी कचेरीत वर्तमान-पत्रांचे काही अंक मिळाले.

काहीही झालं तरी आज घासा गाठायचेच असा आमचा निश्चय होता. म्हणजे पुढे तीन दिवसात मुक्तिनाथला जाता आलं असतं. फारसा वेळ न घालविता आम्ही पुढे निघालो.

" पासपोर्ट, पासपोर्ट, पासपोर्ट !"

दानाची हद्द आम्ही ओलांडित होतो. इतक्यात मागून पळत पळत पोलिस आला. आम्ही थबकलो. पोलिस ठाण जवळच होते.

" भारतीय लोगोंको पासपोर्टकी जरूरत नही होती । " ठाण्याकडे जाता जाता प्राध्यापक पोलिसाला म्हणाले. त्याने आम्हांला एकदा न्याहाळून घेतलं. " हां !" त्याने आमच्याकडे पाहत मान हलविली. " आप कहाँके रहनेवाले ?" वरून प्रश्न

# आणि धवलगिरी

आला. आम्ही वर बघितलं. एक टक्कल पडलेली, गोरी व्यक्ती हसून विचारीत होती. तो इथला पोलीस इन्स्पेक्टर. आम्ही मुंबईकडचे म्हणताच त्याला विशेष आपुलकी वाटलेली दिसली. पुढील मार्गासंबंधी त्याने सूचना दिल्या. 'घासा फार लांब आहे. आज अलीकडेच मुक्काम करा.'

त्याचा निरोप घेऊन पुढे निघालो. आम्ही भारतीय, त्यामुळे पुढे जायला आम्हाला परवानगी होती. इतर देशीयांना मात्र खास परवान्याशिवाय पुढे जाव-यास मिळत नाही.

नदीचो घळई अधिक निरुंद होत चालली. फत्तरांच्या राशीमधून मार्ग काढीत, गर्जना करीत गंडकी फेसाळत होती. बडव्यांना उत्साह आला होता. निरनिराळ्या फत्तरावर त्यांच्या हातोडीचे घाव पडत होते. " हा प्युअर ग्रॅनाइट, हा ग्रॅनाइट–

२ । । । प्रकाश गोखले । । ।

नाइस, हा शिस्टोज–नाइस!" विचित्र नावे आमच्या कानावर पडत होती. तऱ्हेतऱ्हेचे नमुने गोळा होत होते. त्यांचे ओझे न्यायचे कसे ही नवीन समस्या निर्माण होऊ पाहत होती.

दोन्ही तीरावर नदीने गच्च्या निर्माण केल्या होत्या. "नदीने डोंगरांना भेटून घळई पाडली. पण पृष्ठभाग पुन्हा वर उचलला गेला. त्यामुळे या गच्च्या निर्माण झाल्या." बडव्यांनी स्पष्टीकरण दिले. या गच्च्यांवर दाट जंगल होते, अन् मागे आकाशात उंच घुसलेले पहाड. मध्येच गच्ची संपे आणि कपार फोडून मार्ग काढलेला असे. डोक्यावर पहाडाचे छत. जरा उंच माणसाला वाकूनच जावे लागेल. दुसऱ्या बाजूला पाहायची सोय नाही. हजार फूट खोल गडगडाट करीत चाललेल्या नदीकडे पाहून डोळे फिरायचे. अंधार पडत चालला होता. घासा किती लांब आहे याचा पत्ता नव्हता. काळे–निळे जंगल अन् त्या मागील पर्वतांचे उग्र सुळके. एकूण देखावा छाती दडपून टाकणारा होता.

इतक्यात एका वळणावर थबकलेल्या व्यक्तीकडे आमचे लक्ष गेले. उग्र, मंगोलियन चेहरा, विप्पाड, उंच शरीरयष्टी, लांब केसांच्या छोटचा वेण्या घातलेल्या. पायघोळ, जाड कोट कंबरेशी आवळलेला. हातातल्या सुऱ्याने झुडुपे छाटण्याचे त्याचे काम आम्हाला पाहून थांबले.

"खम्पा!" आम्ही पुटपुटलो. त्याच्यावर नजर स्थिर ठेवीत पुढे गेलो. डोळ्यांच्या कोपऱ्यातून तो मिस्किलपणे हसला असे वाटले मला. आतापर्यंत रेंगाळणाऱ्या हमालांची गती वाढली. हातातले टॉर्च पेटवून आम्हीही जंगल कापू लागलो.

घासा गाठण्यास रात्रीचे नऊ वाजले. बऱ्यापैकी भट्टी पाहून आम्ही धरणीवर अंग टाकले.

घासा गावही मोठे आहे – शंभर–दीडशे घरांचे. आजूबाजूला देवदार आणि इतर सूचिपर्णी वृक्षांचे दाट जंगल आहे. हे गावही गंडकी नदीकाठच्या एका गच्चीवर वसले आहे. तिबेटी वंशाचे लोक येथे प्रथम आढळतात. गावाला दक्षिणेस व उत्तरेस दोन मोठ्या वेशी आहेत. आतल्या बाजूला तिबेटी प्रार्थनाचक्रे आहेत. ठिकठिकाणी विटांचे छोटे–मोठे स्तंभ आहेत आणि त्यावर भुटिया अक्षरे लिहिलेल्या फरशा रचून ठेवलेल्या.

घासा सोडले की गंडकी उत्तरेकडे एक मोठे वळण घेते. हा मार्ग धवलगिरी आणि अन्नपूर्णा शिखरांच्या मधून जातो. दोन्ही बाजूला ही दोन प्रचंड शिखरे द्वारपालासारखी खडी आहेत.

सकाळी दहाच्या सुमारास आम्ही लेते या रम्य गावात पाय ठेवला. लेते खोला आणि गंडकी या दोन प्रवाहांमधील एका प्रशस्त गच्चीवर हे गाव वसले आहे. पार्श्वभूमीला मेपल वृक्षांचे दाट बन आहे. त्यात कस्तुरी मृग सापडतात म्हणे!

या गावातील शाळा मला फार आवडली. साधीच पण-सुबक इमारत, प्रशस्त अंगण आणि पार्श्वभूमीला सूचिपर्णी वृक्षांचे बन व त्यामागे हिमाच्छादित पहाड. इतकी रम्य पार्श्वभूमी शाळेला क्वचितच लाभत असेल. विद्यार्थी बहुतेक कवी होणार या शाळेतले.

हिमालयातील ग्रिफॉन या प्रचंड गिधाडांचा एक मोठा थवा मला येथे पाहण्यास मिळाला.

हिमालयाच्या सर्वोच्च रांगामधून आम्ही हळूहळू बाहेर पडत होतो. गंडकीच्या कृपेने केवळ सात हजार फूट उंचीवरून आम्हांला या नगाधिराजाला ओलांडता आलं.

## खम्पांची भेट

लेतेपासून दोन मैलांवर आपल्या निरुंद घळईतून गंडकी सुसाटत बाहेर पडली. डोंगरांची गर्दी कमी झाली. नदीचं पात्र एकदम प्रशस्त झालं. मैलभर रुंदीच्या दगड-गोट्यांनी भरलेल्या वाळवंटातून असंख्य शाखांनी नदीचं संथ मार्गक्रमण सुरू झालं. हिमालयाच्या रांगा आता दक्षिणेकडे राहिल्या. हिमालय पार करून तिबटच्या पठारावर आता आम्ही शिरत होतो !

लेते सोडलं तेव्हापासूनच झिमझिम पावसास सुरुवात झाली होती. वाळवंटात आम्ही उतरलो तरी तो थांबला नव्हता. पण काही अंतरावरच एक झोपडी दिसत होती. गंडकीला धवलगिरीच्या बाजूने एक खोला मिळत होता. त्या खोल्याच्या तीरावर ती झोपडी उभी होती. पाठीवरची ओझी उतरावयास मिळणार म्हणून अधीर होऊन आम्ही झोपडीत डोकावलो — अन् थबकलो !

झोपडीच्या कोपऱ्यात शेकोटी पेटली होती. अन् चार–पाच खम्पे त्या उबेत शांतपणे बसले होते. शेकोटीचा उजेड त्यांच्या चेहऱ्यावर पडून उन्हाने करपलेले त्यांचे चेहरे अधिकच उग्र वाटत होते. झोपडीत जागोजागी खुंट्यावरून घोड्याच्या पाठीवरची जिने लोंबत होती. मधून मधून म्यान केलेल्या तलवारीही भिंतीला लटकाविलेल्या होत्या. एका कोपऱ्यात एका लाकडी फळीवर ताजे मांस कापलेले दिसत होते.

"चाय मिलेगा ?" प्राध्यापकांनी विचारलं.

"हुँ ! " अर्धवट हास्य करीत शकोटीजवळच्या माणसाने उद्गार काढला. पण 'चाय' हा शब्द त्याला कळला असावा. त्याने आम्हांला आत येण्याची खूण केली. दोन खम्पे उठून बाजूला झाले आणि त्यांच्या जागांवर आम्ही स्थानापन्न झालो.

काय बोलावं हे समजत नव्हतं. प्राध्यापकानी सिगरेटचं पाकीट काढलं. सर्वांनी हसून सिगरेटींचा स्वीकार केला. आमच्यासाठी चहा तयार होऊ लागला. अजूनही गप्पांना सुरुवात होत नव्हती. माझ्या पलीकडेच बसलेल्या खम्पाच्या शेजारी त्याचा म्यान केलेला सुरा पडला होता.

"वहोत अच्छा ! " सुऱ्याला स्पर्श करून मी हळूच म्हटलं. त्या म्यानावरची

नक्षी खरोखरच छान होती. तो हसला. मी, ' विकत देतोस का ? ' विचारलं. मग गप्पांना तोंड फुटलं. ' हे काय, ते काय, याची किंमत काय, ते कोठून आणलं,' वगैरे खुणा आणि मोडकं तोडकं हिंदी असं हे संभाषण चालू झालं.

"त्याच्या गळयात खरा अॅगेट (स्फटिक) आहे, पाहिलात !" बडवे हळूच म्हणाले.

एव्हाना कढत चहाचे पेले आमच्यासमोर आले होते. चहा घेऊन आम्ही सर्वांचा निरोप घेतला. त्यांनीही हसत हसत "नमस्ते" करून मोठ्या अदबीने आम्हाला निरोप दिला. बाहेर पडताना आम्ही नकळतच एकमेकांकडे पाहिलं. "लोक फार अतिशयोक्ती करतात !" प्राध्यापक उद्गारले. आमचे हमाल मात्र येथे चहा घेण्यास थांबले नव्हते !

## थकाली लोकांचा मुलुख

नदीच्या वाळवंटाच्या बाजूच्या टेकड्यांवरून चढत–उतरत रस्ता जात होता. टेकड्यांवर पाईन वृक्षांचे दाट जंगल होते. पाऊस मात्र आता कमी होत चालला होता. तिबेटी पठारावर तर आकाश स्वच्छ दिसत होते व सूर्य तळपत होता.

लारजुंग गावात आमचे हमाल चहा घेण्यासाठी थांबले होते. आता आम्ही थकाली लोकांच्या मुलखात येऊन पोचलो होतो. लारजुंग व टुकुचे ही त्यांची प्रमुख गावे. टुकुचात आज आमचा मुक्काम होणार होता. थकाली लोक मोठे व्यापारी अन् त्यामुळे गबर. पूर्वी तिबेटबरोबर व्यापार करीत. पण चीनने तिबे[illegible] बळकाविल्यापासून हा व्यापार बंद पडला आणि हे लोक आपली गावे सोडू[illegible] पोखरा, तराई, काठमांडू या भागात गेले. खेडेगावातल्या भट्टया बहुतेक थकाल[illegible] लोकांच्याच असायच्या.

लारजुंग गावात प्रवेश करताच डोळयांत भरली ती पॅगोडा पद्धतीची चा[illegible] मंदिरे. थकाली लोकांच्या या चार देवता. त्यांचा धर्म म्हणजे हिंदू व बौद्ध धर्मा[illegible] तील गोष्टींचे विचित्र मिश्रण आहे. मात्र आम्ही ज्या ज्या थकालीला धर्म कोणत[illegible] असे विचारले त्याने ' हिंदू ' असेच उत्तर दिले. नदीकाठच्या सपाटशा गच्ची[illegible] वर गाव वसले आहे. गावातून एक ओढा वाहतो. त्यावर सुंदरसा लाकडी पूल आहे. घरे लाकूड आणि नदीतील गोटे यांनी बांधलेली. घरात जिथे जागा मिळेल तेथे लाकूड साचविलेले. लाकडाचे इतके मोठाले भारे तिकडे रचून ठेवलेले दिसतात की घर माणसांना राहण्यासाठी आहे की लाकूड साचविण्यासाठी, असा संशय यावा. दारातून आत पाऊल टाकलं की एक चौक, त्यात गवत पसरलेलं आणि घोडी अन खेचरं बांधलेली. वर माळा अन् त्यात लाकूड. पाठीमागे घर, ते बहुधा दुमजली. त्याच्या पाठीमागे मोठी मोकळी जागा. ही पूर्वी गुदाम म्हणून वापरीत असावेत. आता काही ठिकाणी मोकळीच पडलेली किंवा काही ठिकाणी नांगरलेली. घराला चांगली प्रशस्त गच्ची. तेथेही धान्य, लाकूड साचविलेले. झोपड्यांचा डोंगराळ

मुलूख माग पडला होता अन् एका नागरी संस्कृतीला—अवशिष्ट नागरी संस्कृतीला—आम्ही सामोरे जात होतो. एवढी मोठी घरे, पण बहुतेक सर्व मोकळी, माणसं हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी, अन् तीही बहुतेक बायका आणि म्हातारे—कोतारे.

लारजुंगमधला रस्ताही विचित्रच. रस्त्यावर पूर्ण आच्छादन. दोन घरांमध्ये अशा तऱ्हेने एक प्रशस्त माळा केलेला अन् त्यात लाकूड साचविलेले.

गावाच्या पाठीमागे मोठे कडे होते अन् त्यात बऱ्याच गुहा दिसत होत्या. पूर्वी तिबेटी टोळीवाल्यांपासून संरक्षण व्हावे म्हणून गावकरी त्यांचा उपयोग करीत असत. काही गुहांतून अजूनही लामा लोक राहतात असे आम्ही ऐकले.

दूरवर टुकूचे गाव दिसू लागलं होतं. दुरून मध्य आशियातील एखाद्या गढीसारखं दिसत होतं ते. रस्ता नदीच्या वाळवंटातून जात होता. नेपाळमधील तिबेटी प्रदेशास सुरुवात होत होती हे नक्की. बाजूच्या टेकड्यांवरील जंगल विरळ होत चाललं होतं. टेकड्यांची उंचीही कमी होत चालली होती. बुटक्या, उघड्या-बोडक्या टेकड्या—महाराष्ट्राची आठवण झाली मला. या टेकड्यांच्या पाठीमागे मात्र निलगिरी पर्वताचे भव्य, हिमाच्छादित शिखर आकाश व्यापून राहिलं होतं.

दम्बुश खोला हा प्रवाह ओलांडून आम्ही टुकुचे गावात पाय ठेवला. १९५० साली या प्रदेशात आलेल्या फ्रेंच गिर्यारोहण मोहिमेने या प्रवाहाच्या काठाने जाऊन धवलगिरी शिखरावर चढाई करण्यास मार्ग मिळतो का, याची टेहळणी केली होती.

एखाद्या गावाला उतरती कळा आली म्हणजे त्याचं स्वरूप कसं दिसतं याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे टुकुचे गाव. पूर्वीचं या भागातील हे मोठं शहर. सगळे सधन व्यापारी येथे ठाण मांडून बसलेले. पण आता गावात शुकशुकाट. तीन–तीन, चार–चार चौकांचे प्रचंड वाडे ओस पडलेले. एवढ्या मोठ्या व्यापारी गावात फक्त एक दुकान शिल्लक उरलेलं. उदास चेहऱ्याच्या म्हाताऱ्या बायका अन् एक म्हातारा याने आमचं स्वागत केलं. म्हातारा बराच माहीतगार दिसला. व्यापारानिमित्त भारतात जाऊन आलेला होता. त्याची मुलं आता धंद्यानिमित्त बुटवल, भैरवा या शहरांत जाऊन राहिली होती.

भट्टी म्हणून एक प्रचंड वाडा आमच्या दिमतीला होता. वाड्याच्या रहिवासी दोन बायका—एक म्हातारी अन् तिची मुलगी. आम्ही आत शिरलो तेव्हा मुलगी लोकरीचा गालिचा विणत होती. आणि म्हातारी बांबूच्या लांब नळकांड्यात चहा बनवीत होती.

" दही मिलेगा ?" भट्टीत पोचलो की वर्तकांचे हे नांदीचे वाक्य असायचे.

म्हातारीला हिंदी मुळीच समजत नव्हते. आमच्या हमालांनी दुभाषाचे काम केले.

" शोधायला पाहिजे." वर्तकांना उत्तर मिळाले. बऱ्याच दिवसांनी सुदैवाने वर्तकांना दही मिळाले. आता उद्या जोमसोम आणि परवा मुक्तिनाथ. जोमसोम-

नंतर निर्बंधित प्रदेशाला सुरुवात होते. जोमसोमच्या पलीकडे सहसा कोणा परदेशी-याला जाऊ देत नाहीत. कारण तिबेटची सरहद्द येथून फार दूर नाही.

दुसऱ्या दिवशी टुकुचे सोडताना जोमसोमच्या पुढे आपल्याला जाऊ देतील का, हाच प्रश्न आमच्या मनात घोळत होता.

चार पांढऱ्या भिंती, वर निमुळते स्लेटचे छप्पर आणि त्यावर छोटासा कळस असलेल्या वेशीतून रस्ता जात होता. वेशीत दोन्ही बाजूंना तिबेटी प्रार्थनाचक्रे होती. सहज नजर वर गेली अन् मन आश्चर्यानं थक्क झालं. छतावर बुद्धाच्या जीवनातली अप्रतिम रंगीत चित्रं रंगविलेली होती. त्यांच्या रेखनपद्धतीवरून वाटत होतं की चित्रे फारशी जुनी नसावीत. ती चिनी पद्धतोची नव्हती किंवा जुन्या बौद्ध पद्धतीचीही नव्हती.


दुतर्फा पसरलेल्या हिरव्याकंच, लुसलुशीत, बार्लीच्या शेतातून नागमोडी वळणे घेत आम्ही चाललो होतो. उघड्या-बोडक्या डोंगरांना बाजूला लोटून नदीने स्वत:साठी चांगला मैल, दीडमैल रुंदीचा राजमार्ग तयार केला होता. कडेच्या गच्च्यांवर बार्ली लावली होती. मध्येच झाडांचा एखादा झुपका दृष्टीस पडे. त्यांत लामांचा विहार लपलेला असायचा. दूर क्षितिजापर्यंत पसरलं होतं नदीचं विस्तीर्ण वाळवंट. चढउतार फारसे नव्हतेच. दूरवर काळे ठिपके मधूनच दिसू लागायचे. ते जवळजवळ येऊ लागले की खेचरांचा कळप लक्षात यावयाचा. मधूनच एखादा तिबेटी घोडेस्वार दौडत जायचा. डोंगरांच्या वळचणीत उभी राहिलेली गावं दुरून मध्ययुगीन गढीसारखी भासायची.

'यू व्हेअर गोईंग, सर ?" दबक्या आवाजात विचारलेल्या या प्रश्नाने मी मागे वळून बघितलं. सात-आठ वर्षांचा, उन्हाने लालबुंद चेहरा झालेला एक मुलगा मला विचारीत होता. डोक्यावर नेपाळी टोपी, अंगात कोट व सुरवार पण कपडे धुळीने भरलेले. स्वारी मार्फाला शाळेत चालली होती.

मोडक्या तोडक्या इंग्रजीत आमचं संभाषण सुरू झालं. "तुम हिंदी नही जानते हो !" वर्तकांनी विचारलं. ते त्याच्याशी हिंदीत बोलण्याचा प्रयत्न करीत होते. पण बिचाऱ्याला फारच थोडं समजत होतं. शाळेत इंग्रजी शिकवितात, हिंदी नाही, तो म्हणाला. आमच्या गप्पा सुरू झालेल्या पाहून त्याची इतर मित्रमंडळीही आमची सोबत करू लागली.

"दी गर्लस् आर माय फ्रेन्डस् !" एकेक शब्द सावकाश उच्चारीत तो म्हणाला. आमच्याबरोबर चाललेल्या तीन शेंबड्या मुलींकडे मी बघितलं. त्यांच्या चेहऱ्यावर लज्जेची खूण मला दिसली नाही. 'तुम्हा सर्वांचा फोटो काढतो.' असं म्हणताच मात्र त्या मुली पुढे पळून गेल्या.

"धिस इज मार्फा," समोर बोट दाखवून तो उद्‌गारला. डोंगराच्या उतरणीवर टप्प्याटप्प्याने वसलेलं मार्फा दिसू लागलं होतं. भुटिया लोकांनी उभारलेले



सिरवा गावात प्रवेश

पांढरे चौथरे लागले अन् टुकुचेसारखी वेस लागली. आत सुंदर रंगीत चित्रे असलेली. उंच, उंच काठ्यांवर हिरव्या-निळ्या पताका जिकडे तिकडे फडकत होत्या. लामांच्या अस्तित्वाची ही आणखी एक खूण. गावातून जाणारा मुख्य रस्ता सोडला तर प्रत्येक रस्ता डोंगरावर चढत गेला होता. म्हणजे एका घराची गच्ची आणि त्यामागील घराचे प्रवेशद्वार एका पातळीवर यायचं.

जोमसोम हे लष्करी ठाणे आणि पोखरा यांच्यांत जो काही व्यापार सध्या चालतो, त्याचे मुख्य केंद्र आहे मार्फा. टुकुचेचे काहीसे महत्त्व आता मार्फाला आलेले आहे. खेचर आणि घोडेवाले यांचे तळ येथे पडलेले असतात. त्यामुळे गावात माणसांइतकेच घोडे आणि खेचरेही दृष्टीस पडतात. बऱ्याच दिवसांनी एक गजबजलेले गाव आम्ही पाहात होतो. येथे तीन-चार दुकानेही दिसली. "यहाँ होटल भी मिलेगा, साब!" आमच्या हमालांनी अभिमानाने सांगितलं. ते हॉटेल आम्ही पाहिलं. दाराशीच बकऱ्याचं मांस कापण्याचं काम जोरात चाललं होतं. छताला समांतर दोऱ्या बांधून मांसाचे तुकडे वाळविण्यासाठी टांगले होते. एकंदर दृश्य ओंगळ होते. पण इकडच्या हवेत हे वाळवत टाकलेलं मांस खराब होत नाही. ताजे मांस नसेल तेव्हा हे सुकं मांसच शिजवितात. या भागात घराघरांतून असं मांस सुकत घातल्याचं दिसतं. आमच्यासाठी हॉटेलवालीनं दुसऱ्या मजल्यावरची

खास खोली उघडून दिली. अन् मेंढयांची मऊमऊ कातडी बसायला अंथरली. चहा॰ बरोबर खास इंडिअन बिस्किटं तिनं आणली.

## ‘साब, जल्दि करो ! हवा चलेगी’

“बाणांचा खेळ पाहायला या !” प्राध्यापक एकदम येऊन म्हणाले. आम्ही हॉटेलातली व्यवस्था पाहात होतो तेव्हा ते मागे गावातच रेंगाळले होते. चहा संपवून आम्ही एका उंच चढणाऱ्या रस्त्याने गेलो व एका गच्चीपाशी थांबलो. गच्ची चांगली शंभर फूट लांब होती. एका टोकाला लांब, तिबेटी झगा घातलेले दहा-बारा लोक जमले होते. प्रत्येकाच्या हातात दोन बाण होते. पन्नास फुटांवर एक फलक होता आणि त्यात मध्यभागी एक ठिपका काढलेला होता. ज्याचे दोन्ही बाण ठिपक्यात घुसतील त्याने इतरांनी लावलेले सर्व पैसे जिंकायचे. खेळ चालू असताना आरडाओरडा खूपच चालला होता पण दोन्ही बाण मात्र कोणाचेच लागत नव्हते.

“साब, जल्दि करो ! हवा चलेगी.” हमाल लवकर चलण्याची घाई करीत होते. “हवा चलेगी” चा अर्थ तेव्हा आम्हांला कळला नाही पण मार्फा ज्या वळचणीत वसले आहे ती संरक्षित जागा सोडून नदीच्या वाळवंटात आम्ही प्रवेश केला मात्र, वाऱ्याच्या एका प्रचंड झोताने आपण भिरकावले जातो की काय, असं वाटलं. हिमालयाकडून घों घों करीत येणारे सोसाटयाच्या वाऱ्याचे झोत आम्हांला पुढे पुढे रेटीत होते. पाठीवरील ओझ्यांमुळे तोल सांभाळणे कठीण जात होते. हमालांना तर फारच त्रास होत होता. “सूर्याच्या उन्हाने तिबेटचं पठार तापतं आणि थंडगार हिमालयाकडून हवा त्या कमी दाबाच्या प्रदेशाकडे जोरात खेचली जाते. प्राध्यापकांनी भौगोलिक मीमांसा केली. डोंगरांनी अडविलेल्या या प्रदेशात गंडकीने तयार केलेला हा मार्ग म्हणजे एक प्रचंड नरसाळे आहे आणि त्यामुळेच अशी हवा येथे घोंघावते. सकाळी दहा वाजून गेले की हे सुसाट वारे चालू होतात आणि दिवसभर चालू असतात. रात्री तपमान उतरले की ते थांबतात. हे चक्र बारा महिने चालू असतं.

प्रदेश आता अधिकाधिक वैराण होत चालला होता. या घोंघावणाऱ्या वाऱ्यात झाडे वाढतच नाहीत. खुरटी ज्युनिपरची झुडपे दिसत होती. नदीची घळई आता अधिकच रुंद झाली होती. इतकी रुंद घळई जगात दुसऱ्या कोणत्याही नदीची नाही. या रुंद घळईतच नदीच्या दोन्ही बाजूंना जोमसोम गाव वसले आहे. मार्फासारखे ते डोंगराच्या कुशीत नाही. त्यामुळे वाऱ्याला प्रतिबंध कोठेच नाही. दिवसभर त्याचं थैमान चालू असतं. दिवसासुद्धा वाऱ्यांपासून संरक्षण देणारे कपडे व कानटोप्या घालून रहिवासी वावरतात. जी काय थोडी झाड आहेत त्यांचं आणि वाऱ्याच द्वंद अव्याहत चालू असतं. दुपारी वारा गरम गरम रेती डोळयांत उडवतो तर संध्याकाळी थंडीमुळे काटयासारखा सलतो.

जोमसोम हे सरहद्दीवरचे नेपाळी लष्कराचे ठाणे. येथे वायरलेस स्टेशनही आहे. सध्या विमाने उतरण्याठी धावपट्टी बांधण्याचे काम तेथे चालू आहे.

गावात शिरताच कुतूहलाने भरलेल्या नजरांनी नेपाळी सैनिकांनी आमचे स्वागत केले. पोलिस ठाण्यावरच्या पोलिसाने मात्र अविकारवाणीने आमची चौकशी केली आणि वरिष्ठांकडे चलण्यास सांगितलं. जाता जाता गावात उतरण्याची सोय चांगली कोठे होईल हेही त्यानं दाखविलं !

## हे लोक कोण ?

गावात रुमालाबाईची भट्टी विशेष प्रसिद्ध दिसली. तेथेच आम्ही सामान टाकलं. पण आम्ही आल्यापासून घरातली वर्दळ एकदम का वाढली हे समजेना. काही लोक घरासमोर गप्पा मारीत उभे होते, काही रुमालाबाईच्या स्वयंपाकघरात घुसून तिच्याशी गप्पा छाटीत होते तर काही मागच्या पडवीवर लक्ष ठेवून उभे होते. या जमावाकडे त्या वेळी फारसं लक्ष न देता आम्ही पोलिस इन्स्पेक्टरला भेटावयास गेलो. त्याने ओळखपत्रे पाहिली, अपेक्षेप्रमाणे पासपोर्ट आहे का, विचारलं आणि हिंदू लोकांना मुक्तिनाथाला जाण्यासाठी पासपोर्टची जरुरी लागत नाही हे अडखळत कबूल केलं. इंग्रजीत लिहिलेली आमची ओळखपत्रं वाचण्यासाठी तो आपल्या हाताखालच्या माणसाची मदत घेत होता. आमच्या भट्टीपाशी घुटमळणारे चेहरे पुन्हा पोलिस ठाण्यातही दृष्टीस पडू लागले तेव्हां कोडं उलगडलं. आमच्यावर नजर ठेवण्यात येत होती तर !

येथील जिल्हाधिकाऱ्यांचीही भेट घेण्याचं आम्ही ठरविलं होतं. आम्ही त्यांच्या घरी पोचलो अन् थोड्याच वेळात घोडा दौडवीत अंचलाधीश–जिल्हाधिकारी–येऊन दाखल झाले.

"आपने काठमांडूसे परमिशन बनाई है ?" त्यांनी विचारलं. "आपल्याजवळ परवाना असेल तर त्यावर लिहिलं असेल, त्या ठिकाणापर्यंतच आपल्याला जाता येईल. परवाना नसेल आणि मुक्तिनाथला जायचं असेल तर हिंदू म्हणून आपण तेथे जाऊ शकता."

परवाना जोमसोमपर्यंतच मिळतो. पुढे जाऊ देत नाहीत, हे आम्हांला कळले होते. म्हणूनच तो मिळविण्याच्या भानगडीत आम्ही पडलो नव्हतो. मात्र मुक्तिनाथाच्या दर्शनाशिवाय शास्त्रीय माहिती मिळविण्याचा आमचा हेतूही आम्ही अंचलाधीशांच्या कानांवर घातला. त्रिभुवन विद्यापीठाचे आज्ञापत्र आमच्याजवळ होतेच. त्यामुळे अंचलाधीशांना परवानगी देण्यास आडकाठी आली नाही. फोटोही घेण्याची परवानगी त्यांनी दिली. मात्र आमच्या तुकडीत परदेशीय माणूस कोणी नाही, याची त्यांनी खात्री करून घेतली.

संध्याकाळ झाली तरी तो राक्षसी वारा थांबला नव्हता. तेव्हा बाहेर पडण्याची सोयच नव्हती. भट्टीच्या उबेत आम्ही उद्याचे बेत करीत बसलो होतो. आमच्यावर नजर ठेवणाऱ्या पोलिसांची वर्दळ चालूच होती. विशेषतः, वर्तकांनी जमविलेल्या वनस्पतींच्या नमुन्याबद्दल त्यांना औत्सुक्य.

"आप कहीं के ?" एका रुबाबदार, मध्यम उंचीच्या तरुणाने आत येत विचारलं. तो आत येताच आत रेंगाळणारे लोक एकदम दक्ष पवित्र्यात उभे राहिले आणि त्यांनी भराभर सलाम ठोकले. एक गुबगुबीत, फूटभर उंचीचं केसाळ कुत्रं येऊन त्याच्या पायात घोटाळू लागलं. इथला बडा पोलिस ऑफिसर दिसत होता तो. तो आमच्यात येऊन बसला. त्याचं नाव सरकार. नाव बंगाली, पण तो तराईतला राहणारा होता. त्याचं शिक्षण मात्र भारतातच झालेलं होतं. त्याच्या खात्यातलं उच्च शिक्षण त्यानं दिल्लीलाच घेतलं होतं.

"आपल्यासारखी सुशिक्षित अन् त्यातूनही भारतीय माणसं इकडे कोणी येतच नाहीत," तो म्हणाला. बऱ्याच दिवसांनी गप्पा मारायला त्याला समानशील माणसं भेटली होती.

पोलिस अधिकाऱ्याशी मनमोकळ्या गप्पा झाल्यामुळे आमच्याबद्दल इतरांना वाटणारा दबाव, संशय नाहीसा झाला व सर्वच वातावरण निवळले. जोमसोम सोडून मुक्तिनाथला आम्ही निघालो, तेव्हा हसून निरोप द्यायला सगळे जमले होते.

गंडकीच्या पात्रातून पुनश्च प्रवास सुरू झाला. बोडके डोंगर, उंच कडे, त्यांतून गुहा, आजूबाजूला खुरटी झुडपे हा देखावा नेहमीचाच झाला होता. मुक्तिनाथ म्हणजे कसे असेल ? बारा हजार फूट उंचीवर जाणार आपण. बर्फ–हिमनदी हा हिमालयाचा नेहमीचा साज दिसेल का ? मी मनाशी तर्क करीत होतो.

"नमस्ते, नमस्ते !" अतिशय अदबीने आलेल्या स्वरांनी मी दचकलो. विरुद्ध बाजूने येणारा एक बौद्ध लामा आणि त्याचा शिष्य आम्हांला अभिवादन करीत होता. आम्ही हसून त्याला नमस्कार केला. नेहमीची प्रश्नोत्तरे झाली. किती अदबीने वागतात हे लोक अन् आम्ही ज्यांच्याबद्दल ऐकलं होतं ते लुटारू, रक्तपिपासू तिबेटी कुठे गेले.

मागून ट्रॅन्झिस्टरचा आवाज आला. एक नेपाळी तरुण झपाझप चालत आमच्यात येऊन मिसळला. त्या पलीकडच्या उंच कड्यांच्या पलीकडे म्हणे एक छोटं खेडं होतं. तिथं तो शिकविण्यासाठी चालला होता. पंधरा दिवसांकरिता. पंधरा दिवसांनंतर दुसऱ्याची पाळी. या असीम प्रदेशात लोक राहतात तरी कोठे कोठे ?

आम्ही भारतीय हे ऐकून त्याने भारतीय आकाशवाणी लावली. दहा दिवसांनी सकाळी आठच्या बातम्या ऐकावयास मिळत होत्या ! पुण्याची काही बातमी आहे का ? आम्ही कान देऊन ऐकत होतो. पण निराशा झाली.

नदीने एक मोठे वळण घेतले. दूरवर कागबेनी गाव आणि त्याच्या परिसरातील हिरवीगार शेते आमची दृष्टी ओढून नेत होती. पण आमचा रस्ता आता गंडकीचा निरोप घेऊन मुक्तिनाथच्या खिंडीकडे जाण्यासाठी डोंगरावर चढत होता.

पायथ्याशीच उद्ध्वस्त झालेलं घर होतं. इतक्या लांब, इतक्या रुक्ष, इतक्या निर्जन प्रदेशात कोण राहात असावं ? पण आमचे हमाल तर चक्क घरात शिरले.

होय, ती भट्टीच होती अन् थोड्याच वेळात गरम गरम चहाचे पेले आमच्यासमोर आले. हाताच्या बोटांवर मोजण्याइतके लोक येथून जा–ये करणार पण त्यांच्या-साठीही येथे चहा तयार होता.

तो उघडा बोडका-डोंगर आम्ही चढू लागलो. नऊ वाजून गेले होते. वाऱ्याचा आवाज परिसरात उमटू लागला होता. त्या झंझावाताच्या आगमनास आता अवघा तासच उरला होता.

## मुक्तिनाथ !

दोन तास आम्ही तो प्रचंड रुक्ष पहाड चढत होतो. वाऱ्याच्या झोतांनी आमची तिरपीट उडण्यास सुरुवात होत होती. खाली खोल कागबेनी दिसत होते. कागबेनी खोल्याच्या बाजूचे उंच सुळके अमेरिकेतील ग्रॅन्ड कॅनियॉनच्या चित्रांची आठवण करून देत होते. सारे वातावरण कसे शुष्क होते. इतक्यात, " साब ! मुक्तिनाथ !! " या शब्दांनी मी भानावर आलो. आम्ही खिंडीच्या माथ्यावर येऊन पोचलो होतो.

" शांग्रि–ला ! " तोंडून अभावितपणे शब्द बाहेर पडले. जेम्स हिल्टनच्या स्वप्नसृष्टीत तर आम्ही पाय ठेवीत नव्हतो ना !

हिरव्यागार वृक्षांनी नटलेली एक सुंदर दरी आमच्या स्वागतास सिद्ध होती. ठायी ठायी पसरलेल्या रसरशीत, हिरव्या शेतांचा मखमली गालिचा तेथे अंथरलेला होता. पिवळी, जांभळी, तांबडी, निळी अशा विविध रंगांच्या फुलांचे रत्नहार वृक्ष-वेलींनी अंगावर चढवले होते. मधूनच निळ्याशार पाण्याचे छोटे छोटे तलाव विखुरलले होते. उंच पर्वतांवरून कोसळणाऱ्या झऱ्यांचे थंडगार, नितळ पाणी त्यांना येऊन मिळत होते. तलावाकाठच्या हिरवळीवर उमदे घोडे मजेत चरत होते. दोन-तीन खेडी झाडीत लपलेली होती. दूरवर मुक्तिनाथाचे पांढरे देवालय व त्याचा सुवर्ण कळस झाडीतून अर्धवट दृग्गोचर होत होते. ती हिमनदी, हिमालयाचं ते रंगेल सौंदर्य कोठे गेलं ? उंच पर्वतांवर, आमच्यापासून दूर, सोळा-सतरा हजार फुटांवर छोटे छोटे हिमखंड दबा धरून बसले होते.

अशा रम्य प्रदेशातून आम्ही मुक्तिनाथाच्या दर्शनास निघालो होतो. वाटेत झारकोट नावाची दोन खेडी लागली ! त्यातली घरे इतकी जुनी की तीन-चारशे वर्षांपूर्वी बांधली आहेत असं वाटावं. पण जुनेपणामुळे त्यांना जे विविध रंग चढले होते ते एकूण प्रदेशाच्या रंगामध्ये पूर्ण सामावून जात होते आणि वातावरणाच्या गूढ रम्यतेत भरच पडत होती. लोकांच्या चेहऱ्यावर-शरीरांवर-पुराणकालाची छाया. पण मोकळ्या हवेत चाललेल्या एका शाळेत एक तरुण, विदेशी कपडे केलेला, नेपाळी शिक्षक इंग्रजी शिकवीत होता. लोक सगळे तिबेटी.

मुक्तिनाथाचे देवालयही जुनाटच वाटते. आत राम, शंकर, पार्वती, काली यांच्याबरोबर बुद्ध आणि मुख्य लामा यांच्याही मूर्ती आहेत. पाठीमागे डोंगरावरील झऱ्याचे पाणी १०८ गोमुखांतून पडते आहे. शेजारी दुसऱ्या एका देवालयात

जमिनीतून ज्वाला बाहेर पडत आहे. या भागात नैसर्गिक तप्त वायूचा साठा आहे हे नक्की. नरसिंहाचेही एक देवालय आहे. देवालयाच्या अवतीभोवती हिम-कबुतरांचे थवे दृष्टीस पडतात. सध्याचे देवालय गेल्या शतकात (१८३७ इ. स.) जंग बहादूर राणा या पंतप्रधानाने बांधले. या प्रदेशात शाळिग्राम सापडतात. ते फोडले तर त्यांत सोने सापडते असा सार्वत्रिक समज. त्यामुळे ते फोडण्यास बंदी आहे. येथील पुजाऱ्याने खास आमच्यासाठी आज अंघोळ केली ! नेहमीप्रमाणे पूजेची दक्षिणा उपटली अन् देवालयाच्या कहाणीबरोबरच आपल्याला पगार किती कमी आहे याचीही कहाणी निवेदन केली ! चीनबरोबरचा व्यापार बंद झाल्यामुळे या देवस्थानास उतरती कळा लागली. ऑक्टोबरमध्ये येथे जत्रा भरते, तेव्हाच काय ते लोक येथे येतात. बाकी वर्षभर कोणी फिरकतही नाही. त्यामुळे येथे धर्मशाळा वगैरे अगदी मोडकळीस आलेल्या आहेत.

देवदर्शन घेऊन आम्ही आमच्या संचारास निघालो. प्रा. गोळे–वर्तक–बडवे यांना एक निराळेच सौंदर्य प्रतीत होत होते. येथील भू-वैशिष्टयांची टिपणे घेण्यात प्रा. गोळे गढून गेले होते. किती अन् कोणते नमुने गोळा करू असं वर्तकांना झालं होतं. इतक्या उंचीवर पिंपळासारखे प्रचंड वृक्ष कसे हा प्रश्न बहुतेक त्यांना सतावणार. बडव्यांच्या हातोडीचा आवाज मधूनमधून घुमत होता. एका प्रचंड, गोल, चपटचा शिळेचं ते बराच वेळ निरीक्षण करीत होते.

"ॲमोनाइट, प्रचंड ॲमोनाइट !" त्यांनी आनंदातिशयाने आरोळी ठोकून आम्हांला तिकडे बोलाविले. लालसर रंगाचे, गोल, चपटे लहान-मोठे खडक तिथे जिकडे-तिकड विखुरलेले होते. ज्या शिळेचं ते निरीक्षण करीत होते तिचा व्यास जवळजवळ आठ फूट होता.

"फार मोठा ॲमोनाइट ! तीन–चार फुटी व्यासाचे ॲमोनाइट द. हिंदुस्थानात सापडले आहेत. पण एवढचा प्रचंड ॲमोनाइटची नोंद अजून झालेली नाही. हा ॲमोनाइटच ही गोष्ट सिद्ध झाली तर एक फार महत्त्वाची गोष्ट सापडवल्याचं श्रेय आपलं ! जगात अजून इतरत्र कोठेही एवढा ॲमोनाइट सापडल्याचं मला तरी वाचलेलं आठवत नाही ! !" बडवे भराभर बोलत होते. उत्साहाने त्यांचा आवाज कंप पावत होता.

ॲमोनाइट हा एक प्रस्तरावशेष्य (फॉसिल). पूर्वी या भागात समुद्र होता, त्या वेळी समुद्रात असलेल्या एका प्रचंड प्राण्याने तयार केलेली ही शिंप. येथील समुद्र नष्ट झाला अन् लक्षावधी वर्षांनंतर सागराच्या पोटातील या वस्तूवर प्रचंड दाब पडून त्याचे प्रस्तरात रूपांतर झाले.

बडव्यांची ही सुवार्ता एकून आमचे कान विद्ध झाले. आमचा सफरीचा शेवट अत्यंत साजेसा झाला. एखादे शिखर जिंकल्याचा आनंद झाला होता आम्हांला !

दुसऱ्या दिवशी परत फिरलो आम्ही. पण येताना तातपानीनंतरही कृष्ण गंडकीची

पाठ आम्ही सोडली नाही. बेती–बागलुंग–कुसुमा या रस्त्याने आम्ही पोखऱ्याला परत आलो. नदीकाठच्या प्रचंड कपारी ठिकठिकाणी फोडून हा रस्ता केला आहे. त्यामुळे तो अवघड आहे. खेचरे फारशी या रस्त्याने जात नाहीत. बेनीच्या अलीकडचा डोंगराळ मुलूख मात्र अगदी महाबळेश्वर–पाचगणीसारखा आहे. बेनीजवळ म्यागदी खोला म्हणून एक प्रचंड प्रवाह धवलगिरीच्या दक्षिण उतारांकडून वाहात येऊन गंडकीला मिळतो. गंडकीची घळई येथे चांगली प्रशस्त होते. मुलूख कोकणासारखा. तांबडी माती, आंबा, फणस यांची झाडे, शंकराचे देवालय अन् त्यापुढचा नंदी.

बागलुंगजवळ धवलगिरीचे पुनश्च दर्शन झाले. पण थोडा वेळच. ढगांनी त्याला घेरून टाकले. पावसाळा जवळ येत चालला होता. त्याची ही चिन्हे. कुसुमा गावी आणखी एक भूशास्त्रीय आश्चर्य पाहावयास मिळाले. डोंगराच्या पोटात पसरलेली लांब-रुंद गुहा अन् आत चुनखडीच्या खडकांचे बनलेले चित्रविचित्र आकार. शास्त्रीय परिभाषेत स्टॅलॅक्टाइट आणि स्टॅलॅग्माइट.

एका प्रवाहाच्या वाळवंटातून चालत चालत आम्ही एक प्रचंड पहाड चढलो अन् अन्नपूर्णा, मच्छपुच्छरे हे ओळखीचे चेहरे एकदम सामोरे आले. पोखऱ्याच्या परिचित पंचक्रोशीत आमचा प्रवेश झाला होता. (अपूर्ण)

O

## □ समाजकारणाचा अर्थकारणावरील प्रभाव

सामाजिक सुधारणेच्या काही भारतीय योजना कार्यान्वित करण्याच्या कामी मदत करण्यासाठी एक डॅनिश समाजशास्त्रज्ञ हेनिंग फ्रीस युनोतर्फे भारतात पाठविण्यात आले होते. त्यांच्या मते आर्थिक विकास आणि सामाजिक प्रगती बरोबरच होत असतात. इतकेच नव्हे तर पुष्कळ वेळा आर्थिक विकास सामाजिक प्रगतीवर अवलंबून असतो. परंतु सामाजिक सुधारणेचा आर्थिक प्रगतीवर पुरेसा प्रभाव पडायचा असेल तर हिंदुस्थानसारख्या देशातल्या लोकांना आपल्या सामाजिक प्रगतीसाठी काय आवश्यक आहे याची नीट जाणीव हवी. त्या प्रगतीत आरोग्य, घरे, बाल-कल्याण, युवक-कल्याण इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. डेन्मार्कमधील युवकांना रिकाम्या वेळात करता येण्यासारख्या हितकारक गोष्टी शोधून काढणे, ही तेथील एक प्रमुख सामाजिक समस्या आहे.



# प्र. तु. दिघे

माझ्या काही कामासाठी मी पुण्याला गेलो होतो. पुण्याला आल्यानंतर तिथल्या काही खास मित्रांच्या भेटी घेतल्या-खेरीज मी कधीच मुंबईला परतत नसतो. एस्. पी. कॉलेज-जवळ विजयनगर कॉलनीमधला आपला बंगला पुरा झाल्या-बद्दलचं पत्र एकनाथकडून नुकतंच मला मिळालं होतं. तेव्हा एका संध्याकाळी त्याचं घर बघण्यासाठी आणि मुख्य म्हणजे त्याच्याशी चार ऐसपैस गप्पा मारण्यासाठी मी आपला मोर्चा त्याच्या घराकडे वळवला. घर ऐन रस्त्यावरच असल्यामुळे ते शोधून काढायला मला फारसा त्रास पडला नाही. मी गेलो तेव्हा एकनाथ आपल्या दिवाणखान्यात जेम्स बॉंडचं कोणतं तरी पुस्तक वाचण्यात रंगला होता. मुंबईत इरोसला

# शेवंती

त्या वेळी "गोल्डफिंगर" हे चित्र चालू होतं. बहुधा त्यासंबंधीचंच पुस्तक असावं. मला पाहताच त्याला खूप आनंद झाला. मोठ्या उल्हासानेच त्याने आपण आपल्या घराला "एरोस" हे नाव का दिलं, ते मला समजावून दिलं. तो म्हणाला माझ्या एकनाथ नावातला "ए" माझ्या बायकोच्या "रोहिणी" ह्या नावातला "रो" आणि त्याच्या मुलाच्या "समीर" ह्या नावातला "स" घेऊन "एरोस" हे नाव तयार झालं आहे. "एरोस" नावातली त्याची खुबी ऐकल्यावर मी त्याला शाबासकी दिली. मग त्यानं मोठ्या उत्साहानं आपलं घर मला दाखवलं. तीन मोठ्या ऐसपैस खोल्या आणि स्वयंपाकघर. ह्या तीन खोल्यांची मांडणीपण मोठी सुबक होती. तसाच चार खोल्यांचा ब्लॉक मागच्या बाजूला होता. तो ब्लॉक एकनाथने एका जर्मन प्रोफेसरला भाड्याने दिला होता. तो जर्मन प्रोफेसर तुकाराम महाराजांच्या अभंगांचे जर्मन भाषेत भाषांतर करण्याचा प्रयत्न करीत होता. म्हणजे एकनाथने आपला शेजार पण चांगला सुसंस्कृत निवडला होता. आपल्या बंगल्याच्या सभोवार एकनाथने निरनिराळ्या प्रकारच्या गुलाबांची रोपटी लावली होती. त्यातल्या काही रोपांना निरनिराळ्या रंगांची लाल-गुलाबी-शेंदरी-पिवळी पांढरी फुलं आली होती. त्या फुलांची शोभा मोठी मनोहारी दिसत होती. सारं घर पाहून झाल्यावर आमचे चहा पोहे झाले आणि मग गप्पा मारण्यासाठी एकनाथाने दोन-चार खुर्च्या बाहेरच्या बागेत मागवल्या आणि मग मोकळ्यावर आम्ही दोघं गप्पा मारीत बसलो. गुलाबांच्या फुलांवरून आमच्या गप्पा सुरू झाल्या. पुण्यामध्ये नुकत्याच सुरू झालेल्या "रोझ सोसायटीचा" तो सभासद झाला होता. आणि जयंतराव टिळकांकडे किती प्रकारचे गुलाब आहेत याची तो मला माहिती देऊ लागला. मग मी त्याला म्हटलं "नुसतं वर्णन करून काय समजणार? काही गुलाबांचे नमुने तरी मला दे." मग त्यानं पाच सहा निरनिराळ्या प्रकारचे गुलाब तोडले नी त्यांचा गुच्छ माझ्या हातात दिला. त्या फुलांचे रंग आणि त्यांचा सुवास अगदी दिलखूष करून टाकणारा होता. हल्ली एकनाथला बागायतीचे जास्त वेड लागलेले दिसत होते. निरनिराळ्या फुलांची आणि फुलझाडांची माहिती देता देता तो मला म्हणाला, "भाऊ, ह्या शेवंतीच्या फुलावरून एका शेवंती नावाच्या बाईची मला आठवण येते. आणि त्या बाईनं खरोखरीच मोठी आठवण करण्याजोगीच कामगिरी केली होती......"

"म्हणजे एकनाथ, तू एखादा बेचाळीस सालामधला किस्सा सुनावतो आहेस की काय ?" मी मोठ्या उत्सुकतेनं त्याला विचारलं.

होय. ते "चले जाव" चळवळीचे आणि गांधीजींच्या "करा किंवा मरा" ह्या संदेशाप्रमाणे वागण्याचे दिवस होते. आमच्या पक्षनेत्यांनी ह्या संदेशाबर वागण्याचा आदेश दिला. ब्रिटिशांचं राज्ययंत्र पूर्णपणे कोलमडून टाकण्यासाठी आमच्या पक्षाच्या निरनिराळ्या टोळ्या, देशाच्या निरनिराळ्या भागात, निरनिराळी कामं करण्यात गुंतल्या होत्या. मी ज्या टोळीचा मुख्य होतो त्या टोळीला सरकारी तिजोरीतले पैसे लुटण्याचं काम देण्यात आलं होतं. त्याप्रमाणे माझी माणसं कोणती गाडी किती पैसा घेऊन कोणत्या ठिकाणाहून कोणत्या ठिकाणाकडे जात आहे ह्याची खडा न् खडा माहिती मला मिळत होती. एक दिवशी मला खबर मिळाली की बडोद्याच्या बाजूने एक गाडी अमुक अमुक वेळेला सुमारे चाळीस पन्नास हजार रुपयांची रक्कम घेऊन मुंबईकडे जात आहे. आमच्या पक्षाला त्या वेळी निरनिराळी कामं पार पाडण्यासाठी पैशाची अत्यंत जरुरी होती. आणि ही संधी आयतीच चालून आलेली होती. ह्या गाडीवर डाका घालून ते पैसे मिळवण्याची योजना मी काळजीपूर्वक आखू लागलो. अगदी जवळच्या, अगदी विश्वासातल्या सहकाऱ्या-कडून मला हवी होती ती माहिती मी मिळवू लागलो. आणि जरूर ती माहिती भराभर माझ्याकडे येऊ लागली.

सरकारी पैसा घेऊन येणारी ती गाडी "साखरी" ह्या गावाजवळून पहाटे अडीच ते तीनच्या सुमारास जाणार होती. आणि साखरी हे गाव असं होतं की गाडीवर हल्ला केला तर आमची मनुष्य हानी फार कमी होण्याचा संभव होता. रेल्वे लाईनच्या आसपास डोंगराळ भाग होता आणि बरीचशी झाडं होती आणि हल्ला करण्यासाठी तीच जागा मी मुक्रर केली. आणि पुढच्या तजविजीला लागलो आणि काय घोटाळा झाला ठाऊक आहे भाऊ ?"

"काय घोटाळा बुवा ?" काळजीच्या सुरात मी विचारलं.

आमच्या ह्या योजनेचा पोलिसखात्याला सुगावा लागला आणि मग पोलिस-खात्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्याची पण खबर मिळाली. आमचा बंदोबस्त करण्यासाठी फौजदार मोरे यांची खास नेमणूक करण्यात आली होती. मग मी ह्या मोरे फौजदारांची अधिक माहिती काढण्याचा प्रयत्न केला आणि मला उपयोगी पडणारी माहिती माझ्या हाती आली. ह्या मोरे फौजदारांची "शेवंतो" नावाची एक रखेली होती आणि ती ह्या "साखरी" गावात—गावाच्या अगदी टोकाला राहात असे. बाईचा बांधा मोठा आकर्षक आणि दिसायला चार—चौघीत उठून दिसणारी होती. बाईच्या हाताशी नोकर—चाकर आणि राहायला खास घर दिलं होतं मोरे फौजदारांनी. लहर लागेल तेव्हा आठ—पंधरा दिवसांनी स्वतः फौजदार तिच्याकडे जिवाची चैन करण्यासाठी येत. आणि ते जेव्हा येत त्या वेळी शेवंतीच्या

घरी नुसता जल्लोष असे. किती बाटल्यांची बुचं काढली जात आणि किती कोंबड्यांच्या माना मुरगाळल्या जात, ह्याचा काही हिशेब नसे आणि शेवंतीदेखील मनापासून त्यांची सेवा करी.

समोर उभा ठाकलेला शत्रू प्रबळ होता आणि त्याच्यापुढे आमची शक्ती अगदीच दुर्बळ होती. ऐन वेळी छत्रपती शिवाजीमहाराजांनी अशाच एका प्रसंगी योजलेली युक्ती मला आठवली. आणि त्याच युक्तीबरहुकूम वागण्याचा मी निश्चय केला. माझ्या जवळच्या सहकाऱ्यांना माझा हा बेत मुळीच पसंत पडला नाही. तशा प्रकारे मी आपला जीव धोक्यात घालण्याचं काही कारण नव्हतं. परंतु मला फौजदार मोऱ्यांच्या सशस्त्र पोलिसतुकडीबरोबर सामना द्यावयाचा नव्हता. कारण समोरासमोर सामना दिला असता तर आमची मनुष्यहानी झाल्यावाचून राहिली नसती. आणि मनुष्यहानी तर मला टाळावयाची होती. त्यासाठीच मी आपला जीव धोक्यात घालण्याचं आणि मनुष्यहानी काहीही करून टाळण्याचं ठरविलं.

मला खबर मिळाली की, ज्या रात्री आम्ही त्या खजिन्याच्या गाडीवर हल्ला करणार होतो त्या रात्री मोरे फौजदार साखरी गावामध्ये संध्याकाळच्या सुमाराला पोलिसपार्टीबरोबर येणार होते आणि गावातल्या शेवंतीच्या घरी जेवणासाठी उतरणार होते. साखरी गावची शेवंती ही फौजदार मोऱ्यांची रखेली असं म्हणायला हरकत नाही. माझ्या मनात एक विचार चमकून गेला की, फौजदारसाहेब तिच्या घरी चांगलं मसालेदार भोजन झोडणार नि मग रेल्वे लाईनच्या आसपास आपल्या बंदोबस्तासाठी येणार. वेळप्रसंग पडला तर हातातल्या बंदुकीने माझ्या साथीदारांचा प्राणदेखील घेणार. तेव्हा आपण असंच केलं तर ... ? शेवंतीच्या हातून जर फौजदाराला तिच्या घरी थोपवून धरलं तर...? सोन्याहून पिवळं ! दुधात साखर पडणार होती ! त्यामुळं सरकारी पैसा फारसे सायास न करता आमच्या हातामध्ये पडणार होता आणि शिवाय आमचा एकही माणूस गोळीबारामध्ये जायबंदी होणार नव्हता.. किंवा कुणी प्राणदेखील गमावण्याचा धोका नव्हता...! हे सर्व ठीक. परंतु शेवंती फौजदारसाहेबाला थोपवून ठेवायला तयार कशी होणार, हाच तर मुख्य प्रश्न होता. मांजराच्या गळ्यामध्ये घंटा बांधल्यावर सारे उंदीर अगदी निर्धास्त होणार होते. परंतु मांजराच्या गळ्यात घंटा बांधायची कुणी, हाच तर मुख्य प्रश्न. शेवटी मीच ते काम माझ्या अंगावर घेतलं...

—शेवंतीचा बंगला...साखरी गावाच्या बाहेर अगदी एका टोकाला होता. तिच्या घराच्या भिंतींना निळा रंग देण्यात आला होता. खिडक्या पांढऱ्या रंगाच्या होत्या. आणि तिच्या दरवाजात तिचा कुत्रा नेहमी बसलेला. स्वतः शेवंती वरच्या माडीवर राहात असे आणि माडीवर जाण्यासाठी ओट्यावरच एक जिना होता...तिच्या घराच्या आसपासच्या जागेची मी बारकाईने टेहळणी केली आणि ज्या दिवशी

आम्ही गाडीवर हल्ला करणार होतो, त्याच्या आदल्या रात्री मी तिच्या बंगल्या-जवळ गेलो. एका सहकाऱ्याला मुद्दामच फाटक्या–मळक्या कपड्यांत मी आपल्या बरोबर घेतला होता. शेवंतीच्या घरासमोर जाताच तो शेवंतीचा कुत्रा त्याच्या अंगावर भुंकू लागला. आणि मग माझा तो मित्र त्या बंगल्याच्या आवारात शिरण्याच्या हुलकावण्या दाखवू लागला...आणि तो कुत्रा त्याच्या पाठीशी पळू लागला. आणि ती संधी साधून मी आवारात शिरलो आणि माडी चढून सरळ वर गेलो... इतक्यात कुठून तरी माझ्या कानावर आवाज पडला...

"यावं...यावं महाराज. रामराम. रामराम. बसावं आपण...काय हवं आपल्याला ?"

चपापून मी इकडे तिकडे पाहू लागलो. वरच्या गॅलरीत एक चकचकीत पितळी पिंजरा टांगलेला होता. आणि पिंजऱ्यातला पोपट हे सारं बोलत होता. मी थोडासा चपापलो. इतक्यात स्वतः शेवंती पुढे आली. अबोली रंगाचं पातळ ती नीटनेटकं नेसली होती. अंबाड्यावर तिनं बारीकशी गुलाबाची कळी खोचली होती. कपाळा-वर बारीकशी टिकली होती. आणि तिच्या हातात कोणतंसं पुस्तक होतं. बाई थोडीशी शिकलेली असावी आणि तिला वाचनाची आवड असावी, असा मी कयास बांधला. मला तिथं पाहताच तिला थोडंसं आश्चर्य वाटलं असावं, असं तिच्या चेहऱ्यावरून दिसलं. तिला फार वेळ गोंधळात न ठेवता मी म्हणालो,

"माझं नाव एकनाथ..."

"अस्सं काय? मग इथं काय ज्ञानेश्वरांची समाधी शोधायला आलात की काय?"

बाईच्या बोलण्याला भलतीच धार होती.

"ज्ञानेश्वरांची समाधी राहू द्या. पण तुम्ही जर माझी विनंती मानली नाही तर कदाचित माझीच इथं समाधी बांधली जाईल......"

"तुमची विनंती ? आणि मी मानणार ?"

"होय."

"माझ्यासारख्या बाईला विनंती करण्याची पाळी तुमच्यावर का यावी ? पण या असे...बसा नि सांगा."

—आणि तिनं आपल्या दिवाणखान्यात नेलं. दिवाणखाना चांगला ऐसपैस होता. दाराला नी खिडक्यांना पडदे लावले होते. एका बाजूला गादी होती. तिच्यावर शुभ्र चादर होती. बाजाची पेटी, तबला, डग्गा ही संगीताची आयुधं तिथं पडलेली होती. एका खिडकीजवळ आराम खुर्ची होती. भिंतीला लागून एक कोच होता. त्याच्या दोन्ही बाजूंना दोन खुर्च्या होत्या. समोर एक संगमरवरी "टॉप असलेलं राऊंड टेबल होतं. त्यावर चकचकीत पितळेचा पानाचा डबा होता. त्यावरून बाईला पानाची सवय असावी असं दिसलं......

बाई कोचावर बसली. हातातलं पुस्तक बाजूला टाकलं. मी शेजारच्या खुर्चीवर

बसलो, आणि ती म्हणाली,

"हूं बोला आता काय म्हणणं आहे तुमचं ?"

"शेवंताबाई– तुम्हांला माहीत असेल की आपले थोर पुढारी परमपूज्य गांधीजी यांना ब्रिटिशांनी तुरुंगात टाकलेलं आहे. तुरुंगात जाता जाता त्यांनी आपल्याला "करा किंवा मरा" हा संदेश दिला आहे. त्याप्रमाणे ब्रिटिशांना हाकलून लावण्यासाठी, त्यांचं राज्ययंत्र उलथून टाकण्यासाठी आपल्या देशात एक प्रचंड लढा चालू आहे. त्यासाठी देशातल्या सान्यांची...गरीब, श्रीमंत, लहान,–थोर मदत हवी. सान्यांच्या मदतीशिवाय हे काम पुरं होणार नाही..." मी समजावून देऊ लागलो.

"एकनाथ– तुम्ही काय म्हणालात त्यातलं एक अक्षरदेखील मला समजलं नाही. कारण मी पडल्ये एक अडाणी बाई–मला तुमची ही भाषा काय समजणार?" शेवंती

"शेवंताबाई महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू हे थोर पुढारी तर तुमच्या माहितीचे आहेत ?"

"त्या देव माणसांची नावं घेण्याइतकं पवित्र नाही आहे हे घर. एकनाथ, ह्या अपवित्र घरात ती नावं उच्चारलीत तर ती नावं मात्र निष्कारण विटाळली जातील."

"–असं म्हणू नका तुम्ही. त्या पवित्र नावाचा जप करूनच कधी कधी साध्या माणसाचा उद्धार होतो."

"पण तुमच्या त्या देशकार्यात माझ्यासारख्या एका क्षुद्र बाईचा काय उपयोग होणार ? "

"शेवंताबाई, ह्या जगात कुणीही क्षुद्र नसतो. तुम्हांला ठाऊक आहे की सेतुबंधनासारख्या महान कार्यामध्ये खारीसारख्या एका क्षुद्र प्राण्याची मदत झाली होती. "

"ती खार भाग्यवान होती एकनाथ. "

"म्हणूनच एका महान कार्यात मदत केलीत तर तुम्हीदेखील तशाच भाग्यवान ठराल..."

"बोला...काय करावं मी ?"

"शेवंताबाई– आम्हांला अशी खबर मिळाली आहे की तुमचे यजमान फौजदार मोरे हे तुमच्या इथं रात्री जेवायला येणार आहेत..!"

"बरं मग ? माझे यजमान माझ्या इथं पुष्कळ वेळा जेवायला येतात...त्याचं काय ?"

"ते जेवल्यावर आम्हांला पकडण्यासाठी...वेळ पडली तर आमच्यावर गोळी झाडण्यासाठी रेल्वे लाईनवर पहारा करणार आहेत आपल्या पोलिसांना घेऊन."

"त्यांचं ते कामच आहे."

"देशावर प्रेम करणान्या लोकांवर गोळी झाडणं हे त्यांचं काम नव्हे."

"पण रेल्वे लाईनवर तुम्ही काय करणार आहा ?"

" गाडीनं जाणारी सरकारी तिजोरी आम्ही लुटणार आहो. आमच्या कार्याला पैशाची फार जरूरी आहे. "

" मग लुटारूवर गोळ्या घालणं हे पोलिसाचं काम नव्हे का ?"

" आम्ही तसले लुटारू नव्हेत. आम्ही देशासाठी..."

" ठीक, तुम्ही देशासाठी लुटालूट करा. ते देशासाठी गोळीबार करतील..."

" शेवंताबाई, ते पोटासाठी गोळ्या घालतील—देशासाठी नव्हे आणि देशभक्तावर गोळ्या घालणं हे पाप आहे असं नाही तुम्हांला वाटत..."

" तुम्ही काय बोलता...ते माझ्यासारख्या अडाणी बाईला मुळीच कळत नाही. तुम्ही तुमचं काम करा. फौजदार त्यांचं काम करतील..."

" त्यांच्या कामापेक्षा आमचं काम फार महत्त्वाचं आहे. देशाचं भलं होण्यासाठी आमच्या कामाची फार जरूरी आहे..."

"एकनाथ, मी एक अडाणी...पापाच्या चिखलात रुतलेली बाई. माझ्यासारखीला तुमचं हे बोलणं काय कळणार ?"

" शेवंताबाई, तुम्ही अडाणी असलात तरी आज तुम्ही एक फार मोठं काम करू शकाल...आज मनात आणलंत तर आमच्यापैकी काही लोकांचे प्राण वाचवू शकाल आणि आमचं काम जर सुरळीत पार पाडायला मदत केलीत तर देशाचं थोडंफार कल्याण करायला मदत केलीत असं होईल..."

" तर मग मी काय करावं असं तुमचं म्हणणं आहे ?"

" तुम्ही एकच गोष्ट करायची... आणि ती फार सोपी गोष्ट आहे..."

" कोणती गोष्ट ?"

" फौजदार मोरे हे उद्या रात्री इथंच राहतील...अगदी रात्रभर...उजाडेपर्यंत इथंच राहातील अशी काही तरी व्यवस्था तुम्ही करायची..."

" म्हणजे रात्रभर त्यांना इथून हलू द्यायचं नाही ?"

" अगदी बरोबर..."

" आणि मी तसं नाही केलं तर...?"

" आमच्या काही लोकांचे प्राण जातील..."

" आणि...?"

" आमचं काम पुरं होणार नाही. "

" आणि ?"

" देशाचं कल्याण साधणार नाही. "

" आणि ?"

" हाती आलेली एक पुण्यकृत्य करण्याची संधी तुम्ही गमावून बसाल. "

पुण्याची मातब्बरी कुणाला सांगता एकनाथ ? माझ्या सारखीला जिनं जन्मभर पापच केली तिला ? अहो माझ्यासारखी एक वारयोषिता—एक गणिका तिला

कसलं पुण्य नि कसलं पाप ? स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी गणिका काय पापे करीत असतात ती त्यांची त्यांनाच ठाऊक ! त्यांना कसली देशाची–पुण्याची–देवाची काळजी ?"

"असं बोलू नका शेवंताबाई. पुराणं सांगतात की मनात आल्यावर कान्होपात्रेनं देखील आपला उद्धार करून घेतला......"

"कान्होपात्रा गल्लोगल्ली सापडत नसतात...हजारो वर्षांत एखादी कान्होपात्रा जन्माला येते..."

"शेवंताबाई,–बोलण्यात बऱ्याच पटाईत दिसता तुम्ही. वादात तुम्ही कुणाला हार जाणार नाही...पण एक ऐका–माझी विनंती मान्य करा. हवं तर तुमच्या पुढं पदर पसरतो पण माझं काम करा, फौजदार मोऱ्यांना तुम्ही इथून जाऊ देऊ नका."

"एकनाथ...आताच्या आत्ता जर मी तुम्हांला पोलिसांच्या स्वाधीन केलं तर...?"

"तुमची मर्जी...!"

"तुमच्या बोलण्यावरून असं दिसतं एकनाथ, की तुमच्या लोकांनी देशासाठी म्हणा किंवा कशासाठी म्हणा अशा बऱ्याच ठिकाणी लुटालूट केलेली असणार... पोलिसांशी तुमच्या झटापटी झालेल्या असणार...आणि त्या झटापटीत तुम्ही काही पोलिसांना ठार केलेलं असणार..."


काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे ॲण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

" तुम्ही म्हणता ते अगदी बरोबर आहे शेवंताबाई, तुमच्या हुशारीचं कौतुक वाटतं मला "

" पुढं ऐका...सरकारनं तुम्हांला पकडून देण्यासाठी बक्षिसं जाहीर केली असणार..."

" अगदी बरोबर...! मला पकडून देणाराला दहा हजाराचं बक्षीस जाहीर केलंय सरकारनं..."

" होय ना...मग असे आयते माझ्या दाराशी चालत आलेले दहा हजार रुपये मी घालवू कशाला ?"

" ठीक आहे. द्या मला पोलिसात नि मिळवा दहा हजार रुपये "

" त्या दहा हजारांचा मला म्हातारपणी केवढा उपयोग होईल..."

" बरोबर..."

" तेवढे पैसे हाताशी असल्यावर मग मला कुणाच्या तोंडाकडे पाहाण्याची जरुरी नाही..."

" अगदी बरोबर "

" एकनाथ...मी इतकं बोलत्ये तरी तुम्ही इथून पळून कसे काय जात नाही ?"

" कारण...माझा माणुसकीवर विश्वास आहे "

" गणिका काय माणूस असू शकते ?"

" प्रत्येक प्राण्यामध्ये देवाचा अंश असतो "

" तसाच प्रत्येक प्राण्यामध्ये दानवाचा अंश असतो "

" आवाहन केल्यावर प्रत्येक प्राण्यातला देवाचा अंश प्रकट होत असतो..."

" कधी कधी दानवाचा अंश पण प्रकट होतो "

" माझा देवावर विश्वास आहे. "

" माझा दानवावर आहे "

" तरी देखील ..पुन्हा एकदा तुम्हाला विनंती करतो...काही करा पण उद्या रात्रभर फौजदार मोऱ्यांना इथंच थोपवून धरा...त्यांना इथून हालू देऊ नका. "

" एकनाथ...उद्याची बात उद्या. पण आजच मी तुम्हांला इथून हालू दिलं नाही तर...?"

" ह्या प्रश्नाचं उत्तर मी मघाशीच दिलंय..."

" एकनाथ–तुम्ही बेडर दिसता...!"

" देशभक्ताला तसं बनावं लागतं..."

" देशभक्ती कशाशी खातात, मला ठाऊक नाही "

" देशभक्ती प्यावी लागत्ये ..."

" काय म्हणालात ? प्यावी लागते ?"

"होय देशभक्तीचं वारं प्यालं की देशभक्ती अंगावर येते...अगदी दारूसारखी... शेवंताबाई !"

"दारू अंगावर आलेली माणसं पुष्कळ पाहिली होती मी. पण आज देशभक्ती अंगावर आलेला माणूस पाहिला."

"मग कराल माझी विनंती मान्य ?"

"एकनाथ...आता फार वेळ इथं राहू नका. दुसऱ्या कुणी तुम्हांला इथं पाहण्यापूर्वी तुम्ही इथून जा कसे. कदाचित फौजदार मोऱ्यांचाच शिपाई आता इथं एवढ्यात येईल...आणि तुम्ही आयते त्याच्या हातामध्ये सापडाल..."

"पण मग माझ्या उद्याच्या कामाचं काय ?"

"उद्याचं उद्या...एकनाथ."

"तसं नाही. शेवंताबाई...उद्याच्या कामाबद्दल तुम्ही मला आश्वासन देईपर्यंत मी इथून हालणार नाही."

"एकनाथ...आता मी तुमच्या पाया पडते, पण तुम्ही इथून जा कसे...जा... जा...जा..."

"पण माझ्या उद्याच्या..."

"एकनाथ...मी तुमच्यापुढं पदर पसरते...पण आता एक पळभरदेखील थांबू नका...जा...जा...जा..."

आणि मग तसाच तिच्या घरातून मी बाहेर पडलो. शेवंतीबरोबर झालेल्या माझ्या बोलण्यावरून माझी खात्री पटली होती की, ती एक हुशार आणि बरंचसं वाचन केलेली बाई आहे. तिच्या बुद्धीची चमक माझ्या चांगलीच प्रत्ययाला आली. परंतु तिच्या एकंदर बोलण्याचा नि वागण्याचा मला नीटसा अर्थ लावता येत नव्हता. तिचं बोलणं नि वागणं याचा मला मेळ घालता येत नव्हता...तिला जर पैशाची हाव असती तर मी आयताच हातामध्ये सापडलो होतो. तिनं मला पोलिसांच्या स्वाधीन करून दहा हजारांचं बक्षीस का मिळवलं नाही ? --की आम्हांला मदत करण्याचा तिचा हेतू आहे. तसा हेतू असेल तर स्पष्ट शब्दांत तिनं तसं का सांगितलं नाही ? तिच्या बोलण्यात नि वागण्यात काही तरी गूढ होतं...दुसऱ्या दिवशी ती काय करणार होती, याचा मला अंदाज बांधता येत नव्हता. त्यामुळे ठरवल्याप्रमाणे सरकारी तिजोरी घेऊन येणाऱ्या गाडीवर हल्ला करावा की, करू नये, याचा मला निर्णय घेता येईना. शेवंतीनं जर त्या फौजदाराला थोपवून धरलं तर आपलं काम कसं आणि किती सुरळीत पार पडेल, त्याचे विचार पुन: पुन्हा माझ्या मनात येत होते. परंतु शेवंती आपण सांगितलेलं ते काम करीलच याची खात्री देता येत नव्हती...आमच्या पार्टीला तर पैशाची अत्यंत आवश्यकता होती. पैशाच्या अभावी आमची बरीचशी कामं अडून राहिली होती...पक्षनेत्यांकडून वारंवार पैशासंबंधी निरोप येत होते. शेवटी कितीही किंमत द्यावी लागली तरी

तो हल्ला करायचाच असा मी निश्चय केला आणि माझ्या सहकाऱ्यांना मी तशा सूचना दिल्या...

भराभर कामं चालू झाली ... कोणती " स्ट्रॅटेजी " वापरायची हे ठरलेलंच होतं. कुणी कुठं उभं राहायचं ... कुणी कोणतं काम करायचं ... संकेताचे शब्द ... संकेताचा आवाज ... शिटी केव्हा मारायची ... कशी मारायची ... तिजोरी हातांत आल्यावर तिचा ताबा कुणी घ्यायचा ... तिजोरी कशी आणि कुठे पळवायची ... पलायन कोणत्या वाटेनं करायचं ...

आणि हल्ला यशस्वी झाला. सरकारी तिजोरी आम्ही काबीज केली. आणि ठरलेल्या ठिकाणी रवाना केली. प्रतिकार झाला परंतु तो गाडीमध्येच असलेल्या तिजोरीचा सांभाळ करणाऱ्या पोलिसांकडून. बाहेरच्या पोलिसांची त्यांना मुळीसुद्धा मदत मिळाली नाही. त्यामुळं त्या पोलिसांवर सहजासहजी आम्हांला विजय मिळवता आला ...


—हा हल्ला झाला तेव्हा फौजदार मोरे आणि त्यांची पोलिसांची फौज कुठेच दिसली नाही. त्यांची पोलिस तुकडी कुठे गायब झाली कुणाला ठाऊक ?

—परंतु मी जे काय समजायचं ते समजून चुकलो. शेवंतीनं फौजदार मोऱ्यांना आणि त्यांच्या पोलिस तुकडीला थोपवून धरलं ... आणि म्हणूनच आम्हाला आमचं काम सुरळीतपणे पार पाडता आलं. शेवंतीनं एक फार मोठी कामगिरी बजावली होती. तिच्या हातून एक फार मोठी देशसेवा घडली होती. मी माझ्या मनातल्या मनात तीला कितीतरी धन्यवाद दिले. नंतर माझ्या सहकाऱ्यांनी तिची चौकशी केली आणि आम्हाला कळलं की—

त्या रात्री फौजदार मोऱ्यांना शेवंतीनं चांगलं मसालेदार जेवण दिलं. त्या रात्री ती त्यांच्याशी फारच लाडात आली. त्यामुळं फौजदार साहेब पण फार खुषीत आले. आधीच शेवंती अभिनयांत वाकबगार त्यात विषय शृंगाराचा ... मग काय ? तिच्या हावभावांना बळी न पडायला फौजदार काय पुरुष नव्हते थोडेच ? शुकमुनी आणि विश्वमित्रदेखील चळले तिथे त्यांचा काय पाड ? ... जेवण झाल्यावर स्वतःच्या हातानं शेवंतीनं एक पानाचा विडा करून दिला ... आपल्या नाजुक हातानं ... प्रेमळ नजरेनं ... तिनं तो विडा त्यांच्या तोंडात घातला ... आणि त्या विड्यानं फौजदारांचा घात केला ... त्यामध्ये झोपेचं काही तरी औषध होतं ... जड जेवण अंगावर आलं ... आणि झोप डोळ्यावर आली ... आणि महत्त्वाचं काम अंगावर असून फौजदार शेवंतीकडे झोपले ते सकाळपर्यंत ... फौजदारांना उठवायला येणाऱ्या शिपायांना शेवंतीनं मुळीच दाद दिली नाही. ते झोपलेल्या खोलीपर्यंत कुणालाही तिनं जाऊं दिलं नाही. परिणाम एकच झाला ... आमचं काम पार पडलं ... आणि फौजदारांचे शिपाई जागच्या जागीच राहिले.

——पुढे फौजदार मोरे यांच्या हातून घडलेल्या निष्काळजीपणाबद्दल त्यांना नोकरीमधून बडतर्फ करण्यात आलं...मोरे खूप चरफडले...शेवंतीवर ते खूप खूप रागावले...आणि शेवटी शेवंतीला त्यांनी रजा दिली.

त्यानंतर शेवंतीनं ते गाव सोडलं. आज ती कुठं आहे...आपला उदरनिर्वाह कसा काय करते...कुणास ठाऊक? परंतु तिनं बजावलेली अमोल कामगिरी आम्हाला कधी विसरता येणार नाही. आमचा एक सहकारी नुकताच दक्षिण भारतामध्ये जाऊन आला. त्याचं असं म्हणणं आहे की शेवंती हल्ली बैरागीण बनली आहे आणि ती एका साधुमहाराजांच्या आश्रमांत राहिली आहे. ○






# रूपवती भार्या शत्रू:!

१४ मार्च १९५० चा दिवस ! इन्स्पेक्टर इन्द्रसिंग आपल्या टेबलापाशी अस्वस्थ चित्ताने बसून होते. गेल्या दोन दिवसांत अनेक प्रयत्न करूनदेखील ट्रंकेत सापडलेले प्रेत कुणाचे आहे हे कळलेले नव्हते. खुनी इसम शोधून काढणं, त्याचा गुन्हा शाबीत करणं, त्यासाठी पुरावा जमा करणं, तो सिद्ध करणं या गोष्टी नंतरच्या होत्या ! त्यासाठी अगोदर खून कुणाचा झालेला आहे हे कळणं आवश्यक होतं.

...अचानक पोलीस स्टेशनच्या व्हरांड्यात दोन माणसे काहीतरी चौकशी करीत असलेली त्यांनी पाहिली. इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांना फार काळ अंधारात राहावे लागले नाही. त्या दोन्ही व्यक्तींना घेऊन कॉन्स्टेबल आत आला. साहेबांना शिस्तीत सलाम ठोकून त्याने "ह्या साहेबाना भेटा" अशा अर्थाने त्या दोन अनोळखी व्यक्तींकडे पाहिले; आणि कॉन्स्टेबल बाहेर निघून गेला. कपड्यांवरून त्यांपैकी एकजण खानदानी रीतीरिवाजातला सुशिक्षित वाटला. इन्स्पेक्टर इन्द्रसिंग काही बोलण्यापूर्वीच त्याने इन्द्रसिंगांशी शेकहँड करून प्रथम आपली ओळख करून दिली, "मी रूपसिंग ! भारोलीचा जहागिरदार ! ऑनररी मॅजिस्ट्रेट सरदार बहादूरसिंग यांचा मी दुसरा मुलगा, आणि हा माझ्या मुलाचा नोकर करमचंद !"

"बरंऽ ! आपल्यासारख्यांना का पोलिस स्टेशनवर यावं लागलं ?"

"साहेब ! माझा मुलगा जसपालसिंग जवळ जवळ एक महिना बेपत्ता आहे. त्याला उद्देशून 'असशील तिथून ताबडतोब निघून ये, वाट पाहात आहे.' अशा अर्थाची जाहिरात देखील इथल्या "डेली मिलाप" या दैनिकात मी १५ दिवसां-पूर्वीच दिली होती. पण त्या जाहिरातीचा काही उपयोग झाला नाही म्हणून आज

— — — — —

२

— — — — —

*माथोने खेळताना भिरकावलेला दगड विहिरीतील ट्रंकेवर पडल्याने एकदम आवाज झाला. नंतर पोलिसांनी ट्रंक बाहेर काढल्यावर त्यातून अर्धवट फुगलेले प्रेत बाहेर पडले.*
*पोलिसी चक्रं वेगाने फिरू लागली. "१–२ महिन्यात एखादी उच्च वर्गातली शीख व्यक्ती बेपत्ता झाली असल्यास कळवा." असा इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांचा हुकूम सुटला.*

---

भारोली पोलिस स्टेशनवर तक्रार केली तेव्हा तिथल्या साहेबांनी सांगितलं की इथ चौकशी करा म्हणून......"

इन्स्पेक्टर इन्द्रसिगांची अस्वस्थता क्षणात दूर झाली. खुनाचा धागा हाती येण्याची शक्यता निर्माण झाली होती ! करमचंदकडे वळून त्यांनी अर्धवट हुकमी व अर्धवट आर्जवी स्वरात विचारले, "तुझ्या मालकाचे कपडे ओळखू शकशील तू ?"

"का नाही साहेब ? सहज ओळखीन !"

"मग या आत."

इन्स्पेक्टर इन्द्रसिगांनी दोघांनाही एका आतल्या खोलीत नेले आणि ट्रंकेत सापडलेल्या प्रेताच्या अंगावरचे कपडे पुढे टाकून त्यांनी प्रश्नार्थक मुद्रेने करमचंदकडे पाहण्यापूर्वीच करमचंदने ते कपडे उचलून म्हटले,

"बरोबर आहेत ! हा सूट जसपालसिंग साहेबांचाच आहे !"

"आणि ही चादर ?"

"ही पण आमचीच !"

जहागिरदार रूपसिंगांनी काहीशा आशेने आणि आनंदाने इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांकडे पाहिले आणि खुर्चीवरून अर्धवट उठत त्यांनी विचारले, "सापडला माझा मुलगा ? कुठे आहे तो ?"

......आणि इन्सपेक्टर साहेबांनी त्यांची कॅप काढून हातात घेतली !

मारोलीची जहागिरी म्हणजे एक बडं प्रस्थं होतं. जहागिरदार रूपसिंगांचा मुलगा जसपाल याचा खून म्हणजे जवळजवळ राजपुत्राचाच खून ! या बातमीला पंजाबमधल्या प्रमुख वृत्तपत्रांनीदेखील पहिल्या पानावर जाड ठशांत प्रसिद्धी

---

**ॲड. माधव कानिटकर**

---

दिली ! पैशाकडे पैसा जातो त्याचप्रमाणे मोठेपणाकडे मोठेपणा जातो ! खून झालेल्या जसपालसिंगांची स्वरूप सुंदर, नाजूक पत्नी पर्लविंदरकौर ही एका बड्या पोलिस अधिकाऱ्याची मुलगी होती ! पोलिसी चौकशीची चक्रे वेगात फिरू लागली ! हे प्रकरण इन्स्पेक्टर इन्द्रसिंगांकडून काढून घेऊन ते एका "वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याकडे" सोपविण्यात आले.

ऐन तारुण्यात असलेला जसपालसिंग हा नुसताच गर्भश्रीमंत नव्हता तर देखणा आणि लाडात वाढलेला जहागिरदार पुत्र होता. वडिलोपार्जित जहागिरीकडे त्याचे म्हणावे तसे लक्ष नव्हते. कुठलंही जबाबदारीचं काम अंगावर घ्यायची त्याची तयारी नसे. "लग्न करून टाकलं की जबाबदारी कळायला लागेल !, येईल आपोआप ताळ्यावर !" असा पोक्त विचार करून जहागिरदार रूपसिंगांनी घरात सून आणण्याचे ठरविले !

जसपालसिंगासाठी वधू-संशोधन सुरू झाले. श्रीमंत तरुण आणि सुंदर तरुणी यांना पति-पत्नी म्हणून एकत्र आणायला फारसा वेळ लागत नाही ! जहागिरदार-साहेबांच्या पुढे प्रश्न होता तो फक्त तोलामोलाचा, खानदानीचा, घराण्याच्या नावलौकिकाचा ! सुदैवाने तोही प्रश्न सुटला. गडगंजसंपत्ती असलेल्या, एके काळी महसूल मंत्रिपद भूषविलेल्या मंत्र्याची नात, आणि एका बड्या पोलिस अधिकाऱ्याची मुलगी असलेली, गोरीपान पर्लविंदरकौर अवघी १७ वर्षांची होती !... पण ती १७ वर्षांची हे सांगायलाच लागत होतं ! गोरा रंग, उफाड्याची बांधेसूद देहयष्टी, उभार उरोज, काळेभोर टपोरे डोळे, विपुल केशसंभार अशा दैवी देणग्या असलेली मादक आणि लोभस सौंदर्याची सून शोधून सापडली नसती ! "मुलगी पाहण्याचा" कार्यक्रम होत असताना जसपालसिंग त्या स्वर्गीय सौंदर्याच्या दर्शनाने स्वतःच थिजून गेला !

......१९४५ च्या मे महिन्यात पर्लविंदरकौरबरोबर जसपालसिंगचे लग्न थाटामाटात झाले. नववधू प्रियदर्शिनी पर्लविंदरकौर अंबाल्याला आलीशान बंगल्यात सुखाने नांदू लागली. लग्नानंतर एका वर्षाच्या आत पर्लविंदरकौर "आई" झाली. आणि पहिल्या मुलानंतर तिला ३ वर्षांनी दुसरी मुलगी झाली. चार वर्षांचा काळ हा हा म्हणता निघून गेला. सरदार रूपसिंगांना आपल्या योग्य निर्णयाचे समाधान वाटले. लग्न करून दिल्यावर मुलगा "खूष" होता, सुखात होता, संसार करीत होता, सुधारला होता ! सून असावी तर अशी ! सरदार रूपसिंगांच्या मनात हे विचार चालू असताना भवितव्यता मनातल्या मनात हसली असेल ! कारण ?...खरा प्रकार ठाऊक होता तो फक्त घरच्या नोकरांना !

तारुण्यात पदार्पण केल्यापासूनच स्वतःच्या लावण्याची पर्लविंदरकौरला जाणीव होती ! आपल्या सौंदर्याच्या प्रभावाची स्वतःच पुन्हाः पुन्हा खात्री पटवून घेणं हा सुंदर स्त्रीचा आवडीचा खेळ असतो ! नुसतं सुंदर असून चालत नाही. सौंदर्य



**‘जे’ घडू नये ते राजरोस घडत होतं !**

टिकवावं लागतं, ते “दिसावं” लागतं ! दोन मुलांची आई झालेली पर्लविंदरकौर पतीकडे आणि मुलांकडे दुर्लक्ष करून अजूनही आरशासमोर तास न् तास उभी राहून स्वतःचं सौंदर्य खुलवीत होती. आणि नवऱ्याला झुलवीत होती ! तिच्या शराबी नजरेचे खेळ लाडिक मधुर हालचाली, मंजुळ आवाज, कुणालाही घायाळ करायला समर्थ होत्या आणि तशातच पर्लविंदकौरचा आतेभाऊ मोहिंदरपालसिंग त्यांच्याकडे ‘पाहुणा’ म्हणून येऊन राहिला होता. ‘ज’ घडू नये ते राजरोस घडत होतं !

आपल्या बायकोच्या आतेभावाने आपल्याकडे येऊन राहणं यात सुरुवातीला जसपालसिंगाला वावगं काहीच वाटलं नव्हतं. जसपालसिंगाच्या कामातदेखील तो त्याला सर्वतोपरी मदत करीत होता; पण जसपालच्या खास नातलगांत कुजबूज सुरू झाली होती. बातमी अशी होती की जसपालसिंगशी लग्न होण्यापूर्वी किती-तरी वर्षं अगोदरपासूनच पर्लविंदरकौरची तिच्या आतेभावाशी–मोहिंदरपालबरोबर–‘भानगड’ होती ! कॉलेजात शिकत असताना मोहिंदरपालसिंग लाहोरला एक खोली घेऊन एकटाच राहात होता. आणि बऱ्याच वेळा पर्लविंदरकौर आपल्या ह्या ‘आतेभावाला’ भेटण्यासाठी मुद्दाम लाहोरला जात होती. रात्री वस्तीला

तिथेच राहात होती ! एकदम आरोप करणं बरं नव्हे, उगाच तमाशा नको, म्हणून जसपालसिंगने काहीशा खुबीने, आणि मोहिंदरपालला अप्रत्यक्ष इशारा मिळेल अशा भाषेत त्याला अंबाल्यातच का होईना पण वेगळे 'बिऱ्हाड' करण्यास भाग पाडले.

....पण त्याचा म्हणावा तसा परिणाम झाला नाही. कित्येकदा जसपालसिंग अचानक घरी येई, तेव्हा मोहिंदरपाल आणि पर्लविंदरकौर तिच्या बेडरूममध्ये गप्पा मारताना त्याला दिसत. तो आला की ओशाळत पण वर वर मात्र 'विशेष' काही दाखवत नसत. त्याच्या अचानक येण्याने नोकर-चाकरांच्या एकमेकांना न बोलता चाललेल्या खुणा आणि इशारे जसपालसिंगाच्या अंगाचा दाह करीत. "रूपवती भार्या शत्रू : ! " या उक्तीप्रमाणे जसपालसिंग साशंक झाला. त्याचे मस्तक सुन्न झाले ! "लोक काय बोलतात ते खरं असेल ? छे: छे: यात काही तथ्य नाही ! सुंदर बायकांच्या नवऱ्यांना त्यांच्या बायकांबद्दल नेहमीच असलं काही तरी सांगितलं जातं ! ती जरा कुठे कुणाशी बोलली की झाली लोकांच्या दृष्टीने भानगड ! पर्लविंदरकौरसारखं रत्नं आपल्याला मिळालं याचा माझ्या नातेवाइकांना मत्सर वाटतो ! ती दोघं लहानपणापासून एकत्र वाढली— खेळली तीसुद्धा बहीण-भाऊ म्हणून ! लोक आवळ्याचा भोपळा करतात ! ....पण.... पण आवळा असल्याशिवाय का लोक भोपळा करतील ? पर्लविंदरकौरला दुसरे-देखील आते-मामे-मावस भाऊ आहेत. त्यांच्याशी पण ती लहानपणी खेळली, मग ते नाही कधी आले मुक्काम ठोकायला ? हाच का आला ? लहानपणी एकत्र खेळणारी मुलं-मुली तारुण्यात पदार्पण केल्यावर त्याच निरागस भावनेने एकमेकां-कडे पाहतात ? शरीरात काही बदल घडत नाहीत ? 'स्त्री'च्या अवयवांची गोलाई 'पुरुषाच्या' मनात विकार उत्पन्न करीत नाही ? शिवाय विवाहित स्त्री-बरोबर संबंध ठेवणारे लोक नेहमीच ती माझी बहीण लागते म्हणून लोकांना सांगतात ! "बहीण" आहे हे सांगावं लागतं ? पर्लविंदरकौरचं नटणं—मुरणं, तो आला की लाजणं ! आतेभाऊ कधी बहिणीच्या बेडरूममध्ये तिच्या अगदी जवळ बसून गप्पा मारतो ? कुणी आलं तर लगेच बाजूला सरतो ? ओशाळतो ? वेगळं बिऱ्हाड करून दिलं तरी एकसारखं इथे येऊन आपल्या बायकोशी गप्पा मारण्याचं याला काय काम ? आणि एवढं 'बोलतात' तरी काय !

मोहिंदरपालसिंग आपल्या कामात आपल्याला मदत करतो ती आपल्या हिता-साठी की पर्लविंदरकौरबरोबर संबंध कायम ठेवण्यासाठी त्याचा तो बहाणा आहे ! आज रात्रीच काय तो सोक्षमोक्ष करून टाकला पाहिजे !

....जसपालसिंगाला कल्पनाही नव्हती की त्या दिवशी रात्री पर्लविंदरकौर तितकीच अस्वस्थ होती ! काहीना काही तरी निमित्त सांगून पर्लविंदरकौर अली-कडे आपल्या पतीबरोबर 'एकान्त' करण्याचे टाळीत होती ! ....आणि जसपाल-

सिंगाचे मन भडकून उठत होते ! एक लावण्यवती रात्रीच्या एकान्तात त्याच्या पौरुषाचा उपहास करीत होती ! त्याचे जहागिरीवरचे लक्ष उडाले होते. लग्नापूर्वीचे सर्व दुर्गुण उफाळून वर आले ! त्याची ' ती ' विचित्र वागणूक सरदार रूपसिंगांच्या लक्षात आली ! जुनी खोडं कधी कधी चुकीची वाटली तरी ती कधी कधी अचूक असतात ! आपला मुलगा पुन्हा असा का विचित्र वागायला लागला ? ' पुरुष चमत्कारिक वागायला लागला की त्याच्या बायकोतच काहीतरी दोष असला पाहिजे हे समजावं ' हे आपलं मत आणि चांदीच्या मुठीची छडी घेऊन सरदार रूपसिंग सुनेच्या संसाराची पाहणी करण्यासाठी दुपारी २ वाजता अचानक आले ! " मोठे मालक " अचानक आलेले पाहून बंगल्यावरच्या नोकरांची धावपळ उडाली ! एकापाठोपाठ एक मुजरे झडले ! जहागिरदार सरदार रूपसिंग बंगल्याच्या प्रशस्त हॉलमध्ये आले तेव्हा तिथे सामसूम होती. घरात कुणीच कसं दिसत नाही ? आपल्या हुकमी आवाजात त्यांनी हांक मारली " बहुरानी ऽऽऽ "

आपली उंची वस्त्रे सांभाळीत पर्लविंदरकौर कशीबशी बाहेर आली आणि अदबीने दूर उभी राहिली.

" जसपाल कुठे आहे ? मी आल्याची वर्दी त्याला अजून गेलेली नाही ? "

" हे बाहेर गेल्येत .... ! "

" बाहेर म्हणजे कुठे ? तुला ठाऊक नाही ? "

" मी त्यांना विचारत नाही कधी .... ! "

" चांगलं करतेस .... ! "

" आणि मुलंही दिसत नाहीत कुठे ? "

" बाहेर गेली असतील...लक्ष्मीबरोबर...त्यांना लक्ष्मी सांभाळते......! "

......आणि हे उत्तर देताना अचानकरीत्या पर्लविंदरकौरचा डोक्यावरून घेतलेला पदर खाली सरकला ! जहागिरदारसाहेब पाहात होते ! अत्यंत तलम कापडाची एकच बिन–बाह्यांची तोकडी चोळी तिच्या अंगात होती ! जे कुणालाही निरखून पाहिलं तरी दिसू नये ते सासऱ्याला सहज दिसलं होतं ! जहागिरदार साहेब जरा तोंड फिरवून बसले आणि त्यांच्या रागाचा पारा बघता बघता वर चढला " नवरा कुठे जातो ते तुला ठाऊक नाही ! बायको म्हणून तुझं कर्तव्य नाही त्याला ते विचारण्याचं ? मुलं कुठे आहेत ते तुला ठाऊक नाही ! त्यांना मोलकरीण सांभाळते ! आई म्हणून तुझं कर्तव्य नाही तिच्यावर लक्ष ठेवण्याचं ? दुपारी २–२॥ ला कुणी मुलांना बाहेर पाठवतात ? ही काय बाहेर जायची वेळ आहे त्यांची ?

" ......आणि आत्ताच बजावतो ही असली चोळी घालून वडील मंडळींसमोर यायची पद्धत नाही या घरची ...! "

पर्लविंदरकौरने पुन्हा एकदा पदर ' घट्ट ' सावरला ! आणि ती खाली पाहू

लागली ! जहागिरदार साहेब अजूनही रागातच होते. "गेले ३–४ महिने बघतोय मी ! जसपाल हल्ली एखाद्या आजाऱ्यासारखा दिसतो !"

"मग त्यात माझा काय दोष ?"

"तुझा काय दोष ? तुझं संसाराकडे लक्ष नाही ! बायकोचं संसारात लक्ष असलं की नवरा आपोआप चांगला दिसतो ! चांगला वागतो ! ......"

......अचानक बाहेरच्या पोर्चमध्ये एक मोटार येऊन थांबली ! उगाच घरची भांडणं आणि भानगडी बाहेर जाऊ नयेत म्हणून त्या खानदानी जहागिरदाराने संभाषण अर्धवट तोडले ! त्यांना काय कल्पना की 'भानगडच' त्यांच्या घरात शिरत होती ! मोहिंदरपालसिंग मोटरमधून उतरून पायऱ्या चढून वर येत होता ! त्याला पाहताच पर्लविंदरकौर खानदानी पद्धतीने (!) आत निघून गेली ! आल्याबरोबर मोहिंदरपालसिंग जहागिरदारसाहेबांच्या पाया पडला !

"नमस्कार जहागिरदार साहेब"

"अरे ! अरे ! नमस्कार अगदी वाकून नसता केलास तरी चाललं असतं!... बसा !"

"तुम्ही हल्ली इथंच असता नाही का !"

"हो......!"

"कसं काय चाललंय ?"

"ठीक आहे.....!"

"आणि ती मोटर कुणाची ?"

"आपली !"

'आपली ?"

"हो म्हणजे ऽऽऽऽ हल्ली मी आणि जसपालनी पार्टनरशिप बेसिसवर नवीन धंदा सुरू केलाय. चांगला जम बसलाय !"

"कसला धंदा ?"

"मोटारी स्वस्त किमतीत विकत घ्यायच्या आणि जास्त किमतीला विकायच्या. मिळेल तो फायदा अर्धा–अर्धा घ्यायचा ! मोटार घेण्यासाठी भांडवल जसपाल देतो आणि ती स्वस्त किमतीत विकत घेणं आणि जास्त किमतीला विकणं यासाठी खटपटी मी करतो ! प्रत्येक गाडीमागे हजार–दीड हजार तरी सुटतात !"

"अच्छा ! अच्छा ! ठीक चाललाय ना धंदा ? सांगत होता जसपाल गेल्यावेळी की तुम्ही त्याला फार मदत करता म्हणून !"

जसपालसिंगची थोडा वेळ वाट पाहून जहागिरदारसाहेब निघून गेले होते. त्यांना कल्पनाही नव्हती की त्यांचा जसपाल त्यांना इथून पुढे कधीच भेटणार नव्हता !

...त्या दिवशी रात्री जसपालसिंग बेडरूममध्ये शिरला तो पर्लविंदरकौरला स्पष्ट जाब विचारण्यासाठी–दुपारच्या प्रकाराने अस्वस्थ असलेली पर्लविंदरकौर कपाळावर डावा हात आडवा ठेवून डोळे मिटून पडली होती. दोन्ही पोरांना मोल-

करणीने केव्हाच दूध पाजून खाली नेऊन झोपविले होते. जसपालसिंग बेडरूममध्ये आल्यावर त्याने पाठीकडे दार लावून घेतले तशी पलविंदरकौरने कूस बदलून भिंतीकडे तोंड फिरवले! 'एकान्त' करण्याची इच्छा नसल्याची तिची ती नेहमीची पूर्वसूचना होती! जसपालसिंगाचा तोल सुटला. त्याने जोरात हाक मारली,

"पलविंदऽऽर मला तुझ्याशी काही बोलायचं आहे–फक्त बोलायचं आहे!"

"पण मग ओरडायला काय झालं?"

- "मला ओरडावं लागलं नसतं. तू झोपेचं सोंग घेऊन पडली होतीस म्हणून ऽऽऽ"

"मी सोंग घेतलं होतं? उगाच काहीतरी बोलू नका! माझं डोकं दुखतंय! आज तुमचे तीर्थरूप येऊन गेले!"

"समजलंय मला ते! म्हणूनच तुला विचारतो की मोहिंदरपालसिंग तुझा कोण?"

"माझा आतेभाऊ आहे तो!"

"तो सारखा इथे कशासाठी येतो?"

"का? माझ्या माहेरच्या माणसांनी माझ्याकडे येऊ नये?"

"पलविंदर! उगाच वेड पांघरू नको. तुझ्या माहेरचं बाकी कुणीच इकडे येत नाही! फक्त हा येतो–आणि मी घरात नसतानाच नेमका येतो–"

"काय झालं आला म्हणून! तरी बरं त्याच्यामुळेच तुम्हांला पैसा मिळतोय! नाही तर तुम्हांला काय कळतंय धंद्यात...!"

"शट्‌अप्! आजपासून त्याची भागीदारी संपली म्हणून समज! त्याला सांग की त्याने इथून पुढे या घरात पाऊल टाकता कामा नये!"

"तुम्हीच सांगा त्याला काय ते! मी सांगणार नाही! पुरुष आहात ना तुम्ही? मग बायकोच्या आडून काय बोलता भेकडासारखे? असला दम तर भेटा त्याला सकाळी आणि सांगा काय ते! येईलच तो!"

तिच्या एकंदर बोलण्याच्या पद्धतीवरून काय प्रकार आहे ते जसपालला कळून चुकले. तशातच "असला दम तर..." या वाक्यातल्या 'दम' या शब्दावर पलविंदरकौरने विचित्र सूचक जोर दिला होता!

जसपालसिंगचे अंग रागाने थरथर कापू लागले. रागाच्या सपाट्यात त्याने पलविंदरकौरच्या एक सणसणीत मुस्कटात मारली! त्या दोघांचे हे भांडण झाले ती रात्र होती ५ फेब्रुवारी १९५० ची!...आणि ती जसपालसिंगाची शेवटची रात्र ठरली! कारण त्याच्या दुसऱ्या दिवसापासून जसपालसिंग कुणालाही दिसला नव्हता.

...जवळ जवळ एक महिन्यानंतर अंबाल्यापासून फार दूरवर असलेल्या ओसाड विहिरीतून बाहेर काढलेल्या ट्रंकेत त्याचे प्रेत सापडले होते!

...आणि या खुनाची चौकशी करण्यासाठी नेमलेला खास 'वरिष्ठ पोलिस अधिकारी' चौकशीची सूत्रे हाती घेण्यासाठी अंबाल्याच्या दिशेने निघाला होता...!

(अपूर्ण)

सुधाकर राजे

# भिंतीच्या पैंबड्या

## □ जागतिक प्रश्नांची गॅरंटीड उत्तरे

हल्लीचे युग स्पर्धांचे आहे, याचा पावलोपावली प्रत्यय येतो. आपल्याकडे साहित्य रसस्पर्धेपासून एखाद्या नवीन साबणाचे बारसे करण्यापर्यंत अनेक स्पर्धा आहेत. परदेशांत तर विश्व-सुंदरी, जगत-सुंदरी, आंतरराष्ट्रीय हवाई सुंदरी, कोलिनस टूथपेस्ट सुंदरी, एंजलफेस ( पावडर ) सुंदरी, सेक्रेटरी सुंदरी अशी सौंदर्याची अनेक प्रकारची व्हरायटी करून घोड्यांच्या शर्यती लावाव्यात त्याप्रमाणे सुंदरींच्या शर्यती लावण्यात आलेल्या आहेत. पण एका अमेरिकन कंपनीने नुकतीच या सर्वांवर ताण केली. इंग्लंड आणि अमेरिकेचे बिघडलेले संबंध पुन्हा कसे सुधारतील, यावर तुमचे मत कळवा, अशी एक स्पर्धा या कंपनीने ठेवली व पाच हजार डॉलर्सचे पहिले बक्षीस ठेवले. घ्या ! पैसे कमावण्याचा याहून अधिक सोपा मार्ग कोणता असू शकेल ? तरी फक्त बाराशे लोकांनीच म्हणे या स्पर्धेत भाग घेतला. आश्चर्य आहे ! दुसरे महायुद्ध चालू असताना "हिटलरने काय केले पाहिजे" हे अधिकारवाणीने सांगू शकणाऱ्या पुणेकर पेन्शनरांनी पर्वतीचा रस्ता फुलून जायचा. आतादेखील इंदिरा गांधींनी आसामचा प्रश्न कसा सोडवावा, येथपासून जॉन्सनने व्हिएटनामचा प्रश्न कसा सोडवावा येथपर्यंत यच्चयावत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समस्यांची डझनावारी गॅरंटीड उत्तरे खिशात घालून बाळगणारी हवी तेवढी माणसे आमच्याकडे गल्लोगल्ली पडलेली आहेत.

खरेच, मला वाटते, आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी यूनोने वाद विवादाचा खटाटोप करण्यापेक्षा अशा स्पर्धा ठेवल्या तर एकही प्रश्न अनुत्तरित राहणार नाही. आणि राजकारण सोडले तरी इतरही बऱ्याच प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्यासाठी स्पर्धांचा उपयोग होऊ शकेल. अस्मादिकांना अजून ज्यांची उत्तरे सापडलेली नाहीत, अशा काही प्रश्नांचे नमुने द्यायचे म्हणजे – १. आज स्वयंपाक कसा झालाय ? २. मी या साडीत कशी दिसते हो ? ३. विस्तवाचा उपयोग प्राचीन मानवाने शोधून काढला की, अर्वाचीन विद्यार्थ्याने ? ४. आकाशातले तारे व हिंदुस्थानातले राजकीय पक्ष यांच्यांत अधिक संख्या कोणाची ? ५. फिफ्टी-फिफ्टी, इव्हिनिंग इन् पॅरिस, नाइट इन् लंडन, मिस्टर एक्स इन् बॉम्बे, ब्लॅक कॅट हे चित्रपट इंग्रजीत

आहेत की हिंदीत ? हिंदुस्थानात एवढा अन्नाचा तुटवडा असूनही येथल्या माणसांत पैसे खाऊन पचविण्याची शक्ती कुठली ?

## □ परमेश्वराचा साडे-नववा अवतार

जगाचा उद्धार करण्यासाठी परमेश्वराचा दहावा अवतार येईल तेव्हा येवो, पण ज्यांना साडे-नववा अवतार म्हणायला हरकत नाही, अशा बीटल्स-गुरू महर्षी महेश योगींनी मात्र आपले कार्य असफल झाल्याचा कबुली जबाब नुकताच दिला आहे. ते म्हणाले, मी परलोक-चिंतनाचा जगभर प्रसार करण्यासाठी नऊ वर्षे खपलो, पण अखेर मी अपयशी ठरलो आहे. अरेरे ! आतापर्यंत अस्मादिकांना आशा होती की, पुढे मागे महर्षींच्या वशिल्याने स्वर्गाच्या ट्रिपचा चान्स मिळाला तर तेथल्या ज्यूकबॉक्सवर बीटल्सच्या रेकॉर्ड दिवसभर ऐकण्याचे स्वर्गसुख भोगता येईल. पण आता ते शक्य दिसत नाही. एका गोष्टीचे मात्र आश्चर्य वाटते. ते म्हणजे टोकियोच्या ट्रिपमध्ये महर्षी म्हणाले होते, परलोक-चिंतन इतके सोपे आहे की, दोन दिवसांत शिकता येईल ! मग तब्बल नऊ वर्षांत ते जगाला शिकता आले नाही ? बिचाऱ्या महर्षींनी तर जेट विमानातून बरीच धावपळ केली होती. पण मला वाटते, त्यांनी ईश्वरभक्तीचा पोस्टल कोर्स ठेवला असता आणि फीत सवलत दिली असती तर जगाचा उद्धार ठरलेल्या मुदतीत होऊ शकला असता. कारण, सहा महिन्यांत स्वराज्य मिळविण्याच्या अफाट गप्पा करता येतात, तर नऊ वर्षांत जगाचा उद्धार करायचे आश्वासन द्यायला काहीच हरकत नाही.

## □ तो भारत दॅट इज ती इंडिया

परवा वर्तमानपत्रात वाचले की, दिल्लीचे काही अतिनव तरुण फॅशन म्हणून कानांत इयर रिंग्ज किंवा टॉप्स घालू लागले आहेत ! पूर्वीच्या भारतात पुरुषांनी एका कानात भिकबाळी घालायची पद्धत होतीच, तेव्हा आताच्या इंडियात त्यांनी दोन्ही कानांत इयररिंग्ज घालायची फॅशन काढली, हे प्रगतीचे द्योतकच आहे. आता ही प्रगती एवढ्यावर थांबू नये, एवढीच त्या अर्धनारी-नटेश्वराजवळ प्रार्थना. कारण भारत दॅट इज नाऊ इंडियाचा उद्याचा नागरिक कसा सालंकृत दिसला पाहिजे. नाही तरी क्रिया आणि प्रतिक्रिया वि द्ध व सारखी असली पाहिजे, असा निसर्गाचा नियमच आहे. तेव्हा केस कापणाऱ्या, स्लॅक घालणाऱ्या व एकूण पुरुषा-प्रमाणे दिसण्याचा शक्य तेवढा प्रयत्न करणाऱ्या तरुणींच्या काळात त्यांची रिकामी पडत चाललेली जागा तरुणांनी भरून काढली तर नवल नाही.

○

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

जुलै ६ ते १२ राशि-भविष्य

**मेष :** पराक्रमस्थ ग्रहांचा पर्वकाल याही आठवड्यात आपण अनुभवणार आहात. आपल्या कर्तृत्वावर संपूर्ण विसंबून राहा. ज्याला ज्याला हात घालाल ते ते यश घेऊन उठेल. या वेळी आपणांस कुणाच्या मदतीचीही अपेक्षा नाही.

या आठवड्यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट – प्रवास, स्थानांतर बदल हीच. दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल. यांत्रिक–तांत्रिक शिक्षणासाठी परदेशी जाण्याचीही काहीजणांना संधी लाभेल. याशिवाय व्यावसायिक दृष्टीनेही काही चिरस्मरणीय घटना घडतील. माझ्या म्हणण्याचा आपणांस प्रत्ययच पाहायचा असेल तर ८ ते १२ जुलै या कालावर सारे लक्ष केंद्रित करा. औद्योगिक प्रगतीला याच वेळी उत्थान लाभेल.

**वृषभ :** जुलै महिन्याचा हा पहिला आठवडा सांपत्तिक दृष्टीने अपेक्षेप्रमाणे अनुकूल ठरला नाही तरी आपल्या मनाला प्रसन्नता व स्वास्थ्य लाभू लागेल. गेल्या महिन्यातील रेंगाळलेली कामे या वेळी गती घेऊ लागतील. मनावरील ओझे उतरल्यासारखे जाणवेल.

या आठवड्याच्या अखेरचे काही दिवस आपणांस इतके अनुकूल जाणवतील की, असे काही प्रगतिदायक घडेल असे आपल्या कधी ध्यानीमनीही नव्हते.

नव्या योजना ११–१२ जुलैपासून आकार घेऊ लागतील, धनिकांचे एनवेळी साहाय्य मिळाल्यामुळे भव्य योजना प्रत्यक्षात उतरविण्यात यश मिळेल. कौटुंबिक वातावरण प्रसन्न दिसू लागेल.

दि. १० ते १२ या काली आपल्या अपेक्षेप्रमाणे सारे काही घडेल.

**मिथुन :** सूर्य-मंगळांचे तुमच्या राशीतून उच्चाटन झाल्याशिवाय हरवलेले स्वास्थ्य गवसण्याची शक्यताच कमी. धावपळ, धडपड करूनही अपेक्षेप्रमाणे काही घडेल ही आशाच खोटी. आणखी ८–१० दिवसच आपणांस हा ताण सहन करावा लागणार आहे.


खुमासदार
बातमी...
SATHE
PICNIC
BISCUITS
आपली आवडती
साठे
पिकनिक
बिस्किटस्
आतां मोहक
हवा-बंद कार्टन्स्मधून
उपलब्ध होत आहेत.
साठे बिस्किट अॅण्ड चॉकोलेट कं. लि., पुणें-२
heros' SBC 281 MAR

शनी लाभस्थानी आल्याने नव्या योजना आखल्या जातील आणि त्या यशस्वी करून दाखवण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

अपयश, अपेक्षाभंग असे काही घडणार नाही. पण मनाची तगमग कमी होणार नाही.

पैसा पाण्यासारखा खर्ची पडेल. नवे मोठाले खर्च डोळयांसमोर दिसू लागतील आणि यातून मार्ग कसा काढावा हाच एक विचार रात्रंदिवस छळत राहील.

दि. ८, ९, १० थोडाफार अनुकूल काल.

**कर्क :** व्ययस्थानच्या ग्रहाचा धिंगाणा थांबल्याशिवाय तुमच्या मनावरील ताण कमी होण्याची शक्यताच नाही. वाढत्या खर्चाला आळा घालण्यात यशस्वी व्हाल असे दिसत नाही. आणि या महर्घतेच्या काळात सांपत्तिक ताण म्हणजे सर्वांवरच ताण.

धनस्थानी गुरू असल्यामुळे अशाही परिस्थितीत आपली प्रतिष्ठा अबाधित राहील.

नोकरीधंद्यातील पेचप्रसंग सुटण्याची लक्षणे दिसू लागतील. राहत्या जागेची विवंचना मिटण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करावा लागेल.

प्रगतीच्या साऱ्या वाटा रोखल्यासारख्या दिसू लागतील. हितशत्रू हात धुऊन पाठीशी लागतील.

दि. ६, ७, ८ काही कामात यश लाभावे.

**सिंह :** प्रतिज्ञेने यश आणि तेही जगाच्या नजरा खिळून राहतील असे मिळणे शक्य आहे—याच कालात.

लाभस्थानात इतके बहुसंख्य ग्रह क्वचितच येत असतात आणि म्हणून अघटित, अनन्यसाधारण असे काही घडून येण्याबद्दल अपेक्षा करायला जागा असते.

त्या आपल्या साऱ्या अपेक्षा आताच नजीकच्या भविष्यकालात पूर्णांशाने सफल व्हाव्यात.

नवे कार्यक्षेत्र हाती येईल. त्या कार्यक्षेत्रात तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल, प्रतिष्ठा खूपच उंचावेल, राजकीय क्षेत्रातही तुमचा आवाज उठू लागेल. सांपत्तिक लाभ अपेक्षेबाहेर होतील, नव्या जबाबदाऱ्या अंगावर पडतील.

दि. ८ ते ११ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**कन्या :** तुमच्या दशमस्थानी जमलेल्या असंख्य ग्रहांकडे पाहून तुमच्या बाबतीत मला असे म्हणावेसे वाटते की, आपल्या जीवनात जास्तीतजास्त भव्यदिव्य काही घडून येणार असेल तर ते याच काली. या विधानातील काही अतिशयोक्तीचा भाग वगळून निदान एवढे तरी निश्चित सांगता येईल की, सध्या आपली पावले प्रगतीकडे पडू लागलेली आहेत.

गुरु–शनीची फारसी अनुकूलता नसल्यामुळे थोडीफार धावपळ, धडपड करावीच लागेल.

या काळापासून आपली सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा वाढीस लागेल, औद्योगिक जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणावर वाढू लागतील. दि. १० ते १२ जुलैपासून सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

**तूळ :** सध्या कोणत्याही कार्यक्षेत्रात आघाडीवर दिसू लागतील तूळ राशी व्यक्तीच. तुमच्या प्रगतीला उत्थान लाभेल याच काली, याच वेळी पैसा चांगला मिळेलच, पण पैशापेक्षा लाख मोलाची प्रतिष्ठा मिळेल.

राजकीय क्षेत्रात तुमच्याविना पान हालेनासे होईल, सामाजिक क्षेत्रात तुमच्या मार्गदर्शनाची गरज भासू लागल. कला, साहित्य–क्षेत्रात तर तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल.

हातून ग्रंथलेखन घडेल, नवे क्रांतिकारक विचार जगापुढे ठेवले जातील. प्रतिभेचा उन्मेष बहरेल.

औद्योगिक क्षेत्रातही बरीच वाढ होईल.

दि. ८ ते ११ या काली अपेक्षेप्रमाणे सारे काही घडावे.

**वृश्चिक :** गेल्या महिन्यापासून परिस्थितीचा ताण असह्य होऊ लागलेला आहे. आठव्या रवि-मंगळाच्या कालात हे अपेक्षित असतेच.

१६ जुलैला सूर्याचे भाग्यस्थानी आगमन घडताच त्या अनिष्ट ग्रहांचा छळवाद कमी कमी व्हायला लागेल. थोड्या दिवसांपुरताच हा अनिष्ट काल आहे.

औद्योगिक तंत्रमंत्रात थोडा फार बदल घडवून आणून पाहा. थोडेफार तरी यश पदरी पडेलच. अनावश्यक खर्चाला आळा घाला. दूरच्या प्रवासाचे शक्य तो टाळा.

स्थावराचा आणि वाहनाचा प्रश्न सध्या तरी सुटेल असे दिसत नाही. उगीच डोक्याला त्रास करून घेऊ नका.

दि. १० ते १२ अनुकूल काल.

**धनू :** प्रकृती, पैसा आणि प्रतिष्ठा या तीन्हीवरही आघात घडून येण्याचा संभव दिसू लागेल. सध्याची ग्रहस्थितीच अशी चमत्कारिक आहे. या पेचप्रसंगामधून मार्ग कसा काढावा ही एकच विवंचना रात्रंदिवस जाणवू लागेल.

तसे काही भिण्यासारखे घडणार नाही. भाग्यस्थ गुरूचे सामर्थ्य आपल्या पाठीशी उभे आहेच की पण सहजासहजी सरळपणाने कोणतीच गोष्ट घडणार नाही. सहकाऱ्यांचे हार्दिक सहकार्य लाभेनासे होईल, पैसा कुठेच दिसेनासा होईल, नको त्या माणसांना भेटण्याचे टाळूनही त्यांच्या भेटीगाठी होऊन मन त्रस्त बनू लागेल.

आवाहन करणे आणि आव्हान देणे या दोन्हीही गोष्टी प्रकर्षाने टाळा.

दि. १० ते १२ थोडाफार यशदायक काल.

**मकर :** सध्याचे आपले दिवस ठीक आहेत. पण भविष्यकालीन अनिष्टतेची चाहूल याच आठवड्यापासून लागू लागेल. सध्या षष्ठस्थानी जमलेले ग्रह लवकरच सप्तमस्थानी प्रवेश करतील आणि मग त्यांच्या धिंगाण्याला आपणास तोंड द्यावे लागेल. यासाठी आपली कामे याच आठवड्यात उरकून घ्या.

खर्चात खूपच वाढ होईल, प्राप्ती काहीशी घटू लागेल. इष्टमित्रांची सहानुभूती आटेल, आणि विरोधक उठाव घेण्याचा विचार करू लागतील. या आठवड्यापासून भविष्यकालीन विरोधाची चिन्हे दिसायला लागतील, व्यापार–धंद्यात विशेषच सावधगिरी बाळगा.

दि. ६ ते ८ काही अनुकूल घटना घडाव्यात.

**कुंभ :** तुमचा सारा अनिष्ट काल आता इतिहासजमा झाल्यासारखाच आहे. साडेसातीच्या अनिष्ट कालातून मुक्त झालाच आहात. शिवाय गुरु–मंगळाचे सहकार्यही आता मिळू लागेल.

आजवर माघार घेणे, दबून वागणे हे सारे प्रकार आपण सहन केलेत. आता आवाज उठवू लागाल.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल, राहत्या जागेची विवंचना मिटेल, वाहनाचा प्रश्न सुटेल, नोकरीधंद्यातील प्रगती दृष्टिक्षेपात येऊ लागेल.

या आठवड्याच्या शुक्र–हर्षल लाभ योगापासून आपली व्यावसायिक प्रगती वेग घेऊ लागेल.

दि. १० ते १२ विशेष लाभाचा काल.

**मीन :** चौथ्या रवि–मंगळाचा छळवाद आता संपुष्टात आल्यासारखाच आहे. पुढील आठवड्यापासूनच सारे काही मनाप्रमाणे घडून यायला लागेल.

उद्योगधंद्याचे तंत्र बदलेल, संपन्न भागीदार मिळतील, नडीअडीला इष्टमित्र धावून येतील. शनी तुमच्या राशीतून निघून गेलेला असल्यामुळे स्थगित कार्यांना वेग येऊ लागेल.

व्यवसायधंद्याला नवे रंगरूप येऊ लागेल, राजकीय क्षेत्रात आपले लवकरच चांगले बस्तान बसेल. आता यापुढे माघार घेणे नाही की, घोळ घालीत बसणे नाही.

दि. १०,११,१२ जुलैपासून सर्वत्र अनुकूल वातावरण दिसू लागेल.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

चौथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.